म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ......का. वा.
क्र. ९१०.

धैर्यवंती

BVBK-0400910
BVBK-0400910

माझ्या छोट्या मित्रांनो-

साहसाच्या अन् मर्दुमकीच्या कथा तुम्हाला नेहमीच आवडतात. राम, कृष्ण, मारुती, शिवाजीमहाराज किंवा राणा प्रताप यांच्या गोष्टी वाचताना तुम्हाला कसं स्फुरण चढतं. वाटतं, आपणही असा पराक्रम करावा. पण नंतर लगेच वाटतं छे! देवादिकांची किंवा महापुरुषांची गोष्टच वेगळी. त्यांना काहीच अशक्य नाही. झालंच तर तो सिनेमातला नायक, सारखं ढिश्यॉंव, ढिश्यॉंव करतो. एकटा आठ आठ दहा दहा जणांना लोळवतो. पण अखेर त्याचं शौर्य पडद्यावरचंच! आपल्याला ते कसं काय जमणार?

खरं सांगू? असं काहीही वाटून घेऊ नका. आतून हिंमत असेल ना तर अगदी तुमच्यासारखी अन् तुमच्या एवढी मुलंसुद्धा धैर्य गाजवतात. साहस करतात. त्यांच्याच या गोष्टी आहेत. यातला समीर किंवा नितीन शहरातला. शाळेत जाणारा. पण बिरजू तर खेड्यातला- शेतकऱ्याचा पोर. बिंदा आणि रतन खेड्यातल्या शिवाय मुली! पण प्रसंग आला तेव्हा या साध्या सुध्या मुलांनीच संकटाला धीरानं तोंड दिलं. कोणंतही साहस करताना आपलं मन आधी खंबीर असावं लागतं. मनोधैर्य हा सगळ्या साहसाचा पाया आहे.आणि मनोधैर्यहे नैसर्गिक जसं असतं तसं प्रयत्न साध्यही असतं!

तर अशा या साहसकथा. तुमच्याएवढ्या मुलांच्या. तुमच्या अवतीभोवती घडू शकणाऱ्या. काही खऱ्यासुद्धा! तुम्ही सुद्धा शूर आहात. धाडसी आहात. अगदी एखाद्या साहस कथेचा नायक (किंवा नायिका) होण्याइतके धैर्यवान आहात!

—तुमच्या साहसाचा नेहमी चांगल्यासाठीच उपयोग करा.

सौ. शकुन्तला फडणीस

BVBK-0400910

वाचनात रंगून जाणारा

श्रीरंग

आणि 'गोष्ट सांग' चा धोशा लावणारा

पराग

या माझ्या भाच्यांस

## धैर्यवंती

पावसाळ्याचे दिवस होते. पाऊस धुवाँधार कोसळत होता. नदी काठोकाठ भरली होती. दुथडी भरून वाहात होती आणि पाण्याची, पुराची मजा बघण्यासाठी माणसांनी गर्दी केली होती. पोरासोरांनी झुंबड उडवली होती. नदीला पाणी अफाट होतं. नजर पोचेपर्यंत आसमंतात जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत होतं. फेसाळणारं, उसळणारं, रोंरावत येणारं, तांबूस, गढूळ पाणी. पुराचं अफाट पाणी बघून माणसाला गंमत वाटते. पण हाच पूर जेव्हा हळूहळू वाढतो तेव्हा साऱ्यांचं धाबं दणाणतं. पाण्याची ताकत अफाट. पंचमहाभूतांतलं एक भूतच ते. असेल तेव्हा सरळ-सूत. पण जर का एकदा त्याचं थैमान सुरू झालं तर? तर तडाखा मात्र जबरदस्त.

आज गोदावरीनं असाच उग्र अवतार घेतलेला होता. उभी पिकं वाहून गेली होती. झोपड्या भुईसपाट झाल्या होत्या. झाडं शेंड्यापर्यंत पाण्यात बुडाली होती. काही उन्मळून वाहून गेली होती. सारं दृश्य भयाण दिसत होतं. सोसाट्याचा वारा त्यात

भरच घालत होता. अन् या अशा वादळवाऱ्यात, तुफानी महापुरात घरात स्वस्थ बसण्याऐवजी गावकरी कामासाठी बाहेर पडले होतें! तशीच महत्त्वाची कामगिरी होती. तशीच आणीबाणीची वेळ होती. पैलतीरावर असलेली वस्ती धोक्यात होती. अवघा पंचवीस उंबरठा. कमीच पण जास्त नाही. ती चिमुकली वस्ती अफाट पाण्यानं वेढली होती. जसजसं पाणी वर चढू लागलं तसतशी तिथली माणसं त्यातल्या त्यात उंच जागी जाऊ लागली. पण जाऊन जाऊन कुठं जाणार? पाण्याची पातळी वाढतच होती. सरते शेवटी भयभीत झालेली ती सारी माणसं जवळच्या एका टेकाडावर आश्रयाला गेली. वरून पाऊस कोसळतोय, खालून पाणी वाढतंय, गार वारा अंगाला झोंबतोय, अंगावरचे अपुरे कपडे भिजून चिंब झालेत, अशा परिस्थितीत अडकलेली पोरंबाळं घाबरून रडू लागली. बायकाही कावऱ्याबावऱ्या झाल्या. म्हातारी माणसं हतबल झाली आणि त्यातल्या त्यात जो तरुण आणि शक्तिमान होती त्यांचाही निरुपाय झाला होता.

आता त्यांच्या हाती फक्त एकच इलाज होता. पैलतीरावरच्या गावकऱ्यांना साद घालणं. पाणी बघायला बाहेर पडलेली माणसं त्यांना दिसत होती. हात उंचावून, खुणा करून, मोठमोठ्यानें ओरडून वस्तीवरची माणसं गावकऱ्यांना हाका मारीत होती. विनंती करीत होती. खरं म्हणजे गावकऱ्यांना एक शब्दही ऐकू येत नव्हता. पण टेकाडावरच्या हालचाली आणि अस्पष्ट गोंगाट सारं सांगून जात होता. 'तुम्ही तरी काही करा हो. आम्ही इथं अडकून पडलोय. पोरबाळं, म्हातारी-कोतारी सारी धोक्यात आहेत आम्हाला मदत करा. आमचे जीव वाचवा!' किडूकमिडूक

झोपडीतच टाकून वस्तीतली सारी माणसं जीव घेऊन पळत सुटली होती. त्यातल्या पुरुष माणसांना आणि जरा मोठ्या मुलांना पोहायला येत होतं. पण घरातल्या इतरांना धोक्यात टाकून हे लोक जाणं शक्य होतं का?

वस्तीवरच्या हाका ऐकून गावकरी काठावर जमा झाले. पूर भयंकर होता हे तर खरंच. पुराच्या उग्र दर्शनानं भांवावलेले गावकरी क्षणभरानं का होईना भानावर आले आणि पुरात अडकलेल्यांची सुटका कशी करावी याचा विचार करू लागले. पैलतीरावरच्या माणसांना सोडवायला पाहिजे हे समजत होतं. पण तरीसुद्धा या महापुरात उडी घालायचं धाडस कोण करणार? या खवळलेल्या पाण्यात नाव कोण लोटणार? गोदामाई तर भलतीच खवळली होती. पाण्यात नाव सोडली तर ती आठदहा हात तरी जाऊ शकेल की नाही याची शाश्वती नव्हती. काय करावं? पण अर्जुना कोळी हिंमतवान खरा. त्यानं कंबर कसली, अन् साद घातली. "चला रं ऽऽ पोरांनो! नाव सोडायला चला.' अर्जुना कोळ्यांचा म्होरक्या. कोळीवाड्यात त्याच्या शब्दाला फार मान होता. पण आता नाव सोडायला त्यानं सांगितलं तेव्हा मात्र सारे लोक टरकलेच.

'अर्जुन्या, अरं काय म्हनतुयास? आता या टायमाला नाव सोडायची?' ईश्वरा म्हणाला.

'ईश्वरा, तू बच्चा आहेस अजून तू थांब घरी.'

तरण्याबांड ईश्वराला हे शब्द झोंबले. 'तसं नव्हं अर्जुन्या' पर पानी बघ एकदा.'

'मग कोळ्याचं नाव कशाला सांगतुयास ?' ईश्वरा समजला.

मग तोही अर्जुनाला सामील झाला.'चला रं ऽ'दोघांनी मिळून आरोळी ठोकली आणि सारेजण नावेकडे निघाले. काहीही झालं तरी नाव पाण्यात लोटायची, वस्तीवरची माणसं सोडवायची असा त्यांनी निश्चय केला.

नावेपाशी सारे पोचले. बापरे! नाव तर पाण्यावर तरंगत तरंगत वर आली होती. उंच पातळीवर चढली होती, अन् नावेचा दोर ज्याला बांधलेला ते झाड पार शेंड्यापर्यंत पाण्यात बुडालं होतं! कुठलं झाड ते चटकन ओळखूही येत नव्हतं. नदीकाठी शंकराच्या देवळाजवळचं झाड. म्हणूनच काही अदमासानं खूण लागत होती. ईश्वरा पाण्यात पडला आणि देवळाकडं जाऊ लागला. ईश्वराच्या मागोमाग भिमू आणि दिपूपण पाण्यात पडले. दोर सोडायचा तर आता दोघातिघांचं काम होतं ते. कारण झाड सबंध पाण्यात बुडालं होतं. झपझप पोहत तिघं झाडापाशी गेले. पण तिथं बघतात तर वेगळीच अडचण! वाहून आलेले ओंडके अन् फांद्या यांचं तिथं गच्चपण झालं होतं. पुढंच देवळाची भिंत होती. त्या भिंतीला तटल्यानं वाहून आलेल्या फांद्या, ओंडके, इतर वस्तू, काटेरी फांदी, त्यांत अडकलेली चिरगुटं, साऱ्यांचं बुंध्याभोवती जसं गच्च कुंपण झालं होतं. आधीच इतक्या खोल पाण्यात बुडी मारून नावेचा दोर सोडणं कठीण, त्यात झाडाभोवती हे गचपण. त्यात आता बुडी घ्यायची कशी अन् दोर सोडायचा कसा? अशक्यच होतं ते.

पण कोळ्यांची जात जिद्दीचीच. चिवट अन् कणखर. वाऱ्यावादळाला, तुफानी संकटाला न डगमगता आपलं कर्तव्य करीत राहणारी. त्यांनी अजून आशा सोडली नव्हती. सगळेच्या सगळे

एकजुटीनं, एकदिलानं प्रयत्न करीत होते. इकडची फांदी ओढ, तिकडचा ओंडका खेच असं त्यांचं चालू होतं. दोराभोवतालचं गचपण दूर करण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालूच होते. त्यांची जिद्द पाहून गावकऱ्यांनाही स्फुरण चढलं. तेही कोळयांच्या मदतीला धावले. कुणी लांब काठया आणल्या, कुणी सळया, भाले आणले, कुणी देवळाच्या भिंतीवर चढून काही करता येईल का ते पाहू लागले. कुणी सुचवलं आता जास्त वाट न पाहता तराफा सोडा. कुणी सुचवलं लाकडी पलंग सोडा. वेगवेगळे विचार आणि वेग-वेगळे प्रयत्न चालू होते.

रतनही तिथेच लुडबुडत होती. आपापल्या परीनं काही सुचवत होती, करत होती. आता तिच्याकडे कुणी विशेष लक्ष देत नव्हतं ते निराळं. पण ती मात्र सगळं काही लक्षपूर्वक पाहत होती, ऐकतही होती. तेरा चौदा वर्षांची ही एवढीशी मुलगी त्या सराईत आणि पटाईत माणसांना सल्ला देऊ बघत होती! अर्जुना तशाही परिस्थितीत हसला. अन् म्हणाला,

'काय ग पोरी, तिथला दोर सोडायचा म्हणजे काय मासं धरन्यावानी सोपं वाटलं तुला?'

रतन गप्प बसली. दोर सोडणं किती कठीण आहे याची तिला स्पष्ट कल्पना होती. तरीसुद्धा कसंही करून नाव सोडायला हवी अन् वस्तीवरच्या लोकांचे प्राण वाचवायला हवेत एवढं तिला कळत होतं. पण हे घडणार कसं? गावकरी आणि कोळी त्यांच्यापरीनं झगडत होते. पण अखेर एक एक करता करता हळूहळू सगळेजण परतू लागले. नाइलाजानं नाव तिथंच सोडून निघून जाऊ लागले. पैलतीरावरची माणसं तिकडून सारं पाहत

होती. खुणा करून आणि ओरडून त्यांच्या प्रयत्नाला उत्साहाचा प्रतिसाद देत होती. पण तरीही एकेकजण परतू लागला. शेवटचा कोळी निघून गेला अन् त्याचवेळी ह्या लोकांचा शेवटचा आशातंतूही तुटला. आता ते पुरते निराधार झाले. विस्तीर्ण पसरलेल्या पुराकडे केविलवाणं बघत जागच्या जागी बसून राहायचं या पलीकडे त्यांना काही भवितव्यच उरलं नाही. निराश झालेली ती माणसं अक्षरशः रडकुंडीला आली.

इतक्यात एकाचं लक्ष रतनकडे गेलं. पैलतीरावर अजून कुणी तरी एक मानवाकृती उभी आहे असं पाहिल्यावर त्यांची आशा पुन्हा पालवली आणि तो पुन्हा मदतीसाठी हाका घालू लागला. त्याला इतरांनीही साथ दिली. अन् परतीच्या वाटेवर असलेली रतन थबकली. पुन्हा मागं वळून पाहू लागली. समोर पाण्यानं वेढलेली माणसं तिला हाका मारीत होती. मदत मागत होती. कोण असतील ती माणसं? आपल्याच बरोबरीच्या मुली, लहान-लहान पोरंबाळं, कुणाच्या आत्यामावश्या, कुणाच्या आज्या-पणज्या— कोण कोण असतील त्यात? एवढ्या लांबून तर चेहरे-सुद्धा धड दिसत नाहीत. पण ती कुणीही असली, ओळखीची किंवा अनोळखी, तरी ती माणसंच होती ! आणि मदतीच्या आशेवर हेलकावत होती! सारेजण परतून गेले पण ही अजून मागं रेंगाळली आहे म्हणून तर ते रतनला हाका घालीत नव्हते? त्यांना मदत देणं, त्यांच्या सुटकेचा प्रयत्न करणं जरूर होतं. मदत केली पाहिजे—सुटका केली पाहिजे—त्यांचे जीव वाचवले पाहिजेत ! कसंही करून त्यांना वाचवायलाच पाहिजे—

अन् हा विचार इतका प्रभावी, इतका प्रबळ झाला की रतनचं

पाऊल तिथून निघेना. तिला कळत होतं की ती एकटी आता काही करू शकणार नाही. जिथं मोठ्या माणसांनी आणि पट्टीच्या कोळ्यांनीही हात टेकले, निराश होऊन नाद सोडून दिला तिथं ही एकटी काय करू शकणार ? पण हे सारं कळत असूनही, अशक्य दिसूनही रतनला माघारी फिरावंसं वाटेना. काही क्षण तिच्या मनाची चलबिचल झाली. पण एकाएकी तिच्या अंगात कुठून अवसान आलं, कसलं बळ संचारलं कुणास ठाऊक ! घराच्या दिशेनं निघालेली ही मुलगी परत फिरली आणि देवळाकडं जाऊ लागली. हात उंचावून तिनंही पलीकडच्या माणसांना खुणावलं.

रतन क्षणभर उभी राहिली. वाऱ्यानं तोंडावर येणारे केस तिने मागं सारले. मोठाल्या पाणीदार डोळ्यांनी आजूबाजूला पुन्हा न्याहाळून पाहिलं. पुढच्याच क्षणी तिचा विचार पक्का ठरला आणि ती देवळाकडं जाऊ लागली. कोळ्याचीच मुलगी ती. तशीच जिद्दी, तशीच चिवट आणि तशीच धैर्याची. तिनं नेसूचा घट्ट काचा घातला. लालभडक पाण्याकडं एकदा पाहिलं अन् शंभूमहादेवाची प्रार्थना करत तिनं स्वत:ला पाण्यात झोकून दिलं. सप् सप् हात मारीत ती देवळाच्या जवळ आली. एव्हाना सत्राच्या गचपणात आणखी एका लांबच लांब वेळूची भर पडली होती. वेळूचं एक टोक गचपणात अडकलं होतं. दुसरं टोक वर तरंगत होतं. रतन पोहत पोहत कळसापर्यंत गेली. तिथं बसण्यासारखी सोयीस्कर जागा होती कळसावर चढून तिनं वेळूचं टोक पकडलं आणि ती ते जोरजोरानं हलवत राहिली. बराच वेळ हलवल्यानंतर अडकलेली एक फांदी बाजूला झाली. आता रतननं त्या फांदीचं टोक धरलं आणि कळसावर बसून दोन्ही हातांनी घट्ट पकडून रतन फांदी हलवतच राहिली. फांदीचं टोक बरंच वर

आलं. त्याला धरून, ओढून, खेचून तिने बुंध्याशी जमलेलं गचपण दूर लोटायचा प्रयत्न चालू ठेवला. मधून मधून हात दुखत. तेवढा वेळ काही क्षणांचा विसावा घेऊन ती पुन्हा आपलं काम चालू करी !

असा किती वेळ गेला कुणास ठाऊक ! हलवून हलवून तिचे हात खांद्यापासून भरून आले. श्रम तर इतके झाले की तिचा काळासावळा चेहरा लाल पडला. बांधलेला बुचडा सुटून केस पुन्हा पुन्हा तोंडावर उडू लागले. अंगातले कपडे भिजून चिप्प झाले आणि आधीच जीर्ण झालेलं लालभडक खणाचं पोलकं अक्षरशः फाटून गेलं. पण रतनला आता कशाची पर्वा नव्हती. फांदीला हिसके देत देत ती तिथंच बसून राहिली. या फांदीला आणखी हिसडे द्यावेत की धरून लोंबकळावं की लांब वेळूनं झाडाभोवती ढोसून पाहावं असे तिचे उलट सुलट विचार चालू होते. डोक्यात विचार चालू. हातानं फांदी हलवणं चालू. असं करता करता एकदम तिच्या हाताला जरा हलकं वाटू लागलं. हे खरं की भास कुणास ठाऊक ! पण आता ती आशेनं पुन्हा जोराजोरानं फांदी हलवू लागली. पण छे ! आता भास कसला ? आता तिला फरक स्पष्ट जाणवत होता. आता पहिल्यापेक्षा निश्चितच हलकं लागत होतं. म्हणजे पाण्यातला अडथळा थोडा कमी झाला असणार. शंकाच नको. घामानं अन् पाण्यान भिजलेल्या तिच्या चेहऱ्यावर नकळत समाधान तरळू लागलं. तिच्या प्रयत्नाला यश येत होतं. आता तिनं पुन्हा जोराचा हिसडा दिला आणि वाऱ्यावादळाला, पुराच्या तडाख्याला टक्कर देत उभा असलेला तो वृक्षराज आता मुळासकट उन्मळून पडला !

रतनचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! हे खरं असेल का ? खरंच का झाड उन्मळून पडलं ? तिच्या एकटीच्या प्रयत्नानं झाड पडलं ? खरं म्हणजे विचारं कालपासून धडपडत होतं, पुराशी टक्कर देत होतं. पण अखेर झाडाचीही ताकत संपली. योगायोगानं का होईना रतनच्या धडपडीला, प्रयत्नाला यश आलं. झाड हळूहळू तरंगत वर आलं. बुंध्याला बांधलेला दोर अन् त्याला दिलेल्या गाठी पाण्यावर हेलकावताना स्पष्ट दिसत होत्या. रतन आनंदाने ओरडली.

'बाबा लवकर ये रं! ए अर्जुनकाका ! ईश्वरा, दिपू ये, लवकर ये! चला रं ऽऽऽ!' तिनं तिच्यापरीनं जास्तीत जास्त जोरात हाका मारल्या. इतक्यात तिच्या लक्षात आलं, पुराच्या पाण्या-बरोबर झाड, झाडाचा दोर अन् दोराबरोबर नाव असं पुढं पुढं सरकतंय ! म्हणजे नाव वाहत जाणार का ? इतका वेळ नाव मोडायला येत नव्हती. आता नाव सोडणं शक्य आहे तर ती डोळ्यांदेखत उताराला लागतीय ! रतन पट्टीची पोहणारी होती. पाहता पाहता ती वाहणाऱ्या झाडाजवळ पोहत गेली आणि एका हातानं दोर खेचण्याचा प्रयत्न करू लागली.

तिनं दोर खेचून धरला आणि ती मोठमोठ्यानं मदतीसाठी हाका मारू लागली. आता तिला बुडायचं भय नव्हतं. एवढ्या मोठ्या झाडाचा आधार होता. तिनं सर्व शक्तीनिशी दोर धरून ठेवला होता. पाण्याच्या जोरानं जर का दोर तुटला तर नाव हातची गमवावी लागणार होती. कसंही करून नाव वाचवायला हवीय. नाव वाचली तरच लोकांचे जीव वाचणार होते मनातल्या मनात ती देवाचा धावा करू लागली आणि तोंडानं मात्र मोठ-

मोठ्यानं आपल्या बाबाला आणि इतरांना हाका मारू लागली. नदीकाठच्या कोळीवाड्यात तिची हाक अखेर पोचली. कोण हाका मारतंय कोणास ठाऊक ? असं म्हणत ईश्वरा झोपडीबाहेर आला. आवाज त्याने ओळखला नाही. पण अगदी दुरून, खोलातून कुणीतरी हाका मारतंय एवढं नक्की. ईश्वरा सुसाट नदीकडे पळाला. त्याच्या मागोमाग दिपू, अर्जुना सारे धावले. आवाज कुठून येतोय हे क्षणभर कळेना. त्यात संध्याकाळ झालेली. पावसाळ्याचा काळोखा दिवस आणखीनच काळा झाला होता. स्पष्ट काही दिसत नव्हतं. पण आवाजाच्या दिशेनं सगळे धावत सुटले.

हा तर रतनचा आवाज ! रतनच होती ती. अपुऱ्या प्रकाशात जरा वेळानं सर्वांना दिसलं एक तरंगणारं झाड अन् झाडावर बसलेली, हाका मारणारी रतन. अर्जुना आणि ईश्वरा पुढच्याच क्षणी पाण्यात पडले आणि पोहत जाऊन त्यांनी रतनला धरलं. तिच्या हातातून नावेचा दोर ताब्यात घेतला. रतननं दोराचे वेढे हाताभोवती आवळून धरले होते. हातावर सबंध वळ उठले होते. तळहात तर सबंध सोलवटून रक्ताळले होते. पण रतननं दोर मात्र सोडला नव्हता. कोळ्याची बहाद्दर मुलगी होती ना ती ! ईश्वरा आणि अर्जुना दोघांनी दोरासकट नाव किनाऱ्यावर ओढून आणली. आज रतनमुळेच नाव बचावली होती ! साऱ्या गावाला आश्चर्य वाटलं. सारे थक्क झाले. मोठ्या माणसांनासुद्धा जे जमलं नव्हतं ते रतनमुळे शक्य झाले. तिचं साहस बघून माणसं इतकी भारावून गेली, तिचं इतकं कौतुक करू लागली की क्षणभर नाव कशासाठी सोडवायची होती याचाही त्यांना विसर पडला !

रतननंच मग आठवण करून दिली 'आता पुरं जालं माजं कवतिक. पल्याडच्या काठावर माणसं अडकून पडल्याती. तिकडं जावा की आता !' मग वल्ही आणली गेली. फळ्या, दोर, रिकामी पिपं हेही जमा झालं. शंभूमहादेवाच्या नावाचा गजर झाला. आणि त्या तुफानी प्रवाहात मोठ्या धाडसानं नाव लोटण्यात आली. एकदा काम सुकर होऊ लागलं म्हणजे सगळा गुंता जणू आपोआपच सुटू लागतो. एवढ्या खवळत्या प्रवाहात नाव लोटूनही आता कोळ्यांना चिंता वाटत नव्हती. आता नशिबाची साथ आपल्या बाजूनं आहे असा जणू आतून त्यांना दिलासा वाटत होता. आता गोदामाईची–गंगामाईची–त्यांना भीती वाटत नव्हती. ती आपली माऊली. ती आपल्या बाजूनंच राहणार असं त्यांना मनोमन वाटू लागलं.

पुराच्या खवळत्या पाण्यात, आडव्या प्रवाहात पाणी कापणं कष्टाचंच होतं. पण त्या कष्टाचंही आता कुणाला काही वाटत नव्हतं. हळूहळू तिरक्या चालीनं नाव पलीकडच्या किनारी पोचली एकदाची. तिथं आनंदानं आणि पुढं यायच्या घाईनं एकच गोंधळ उडाला. शिवाय नाव इकडं आली खरी पण इकडून पुन्हा पलीकडे पोचेपर्यंत काय होतंय आणि काय नाही ! मनात शंकाकुशंका उचंबळू लागल्या. पण असं जरी असलं तरी प्रत्यक्ष नावेत पाय ठेवताना मात्र रिवाजाप्रमाणे प्रत्येकजण मनोमन म्हणाला होता, 'नाव सुखरूप जाऊ दे ! नाव सुखरूप जाऊ दे ! !' आणि खरोखरच नाव सुखरूप दुसऱ्या किनारी लागली. पहिल्या फेरीत बायका अन् लहान मुलं आली. मग नावेनं आणखी चार फेऱ्या केल्या. जरा मोठी मुलं, म्हातारी माणसं, अन् सर्वात शेवटी

तरुण माणसं. खवळत्या पाण्यात, चांदण्याच्या प्रकाशात नावेचा प्रवास होता. पण आता कुणाला चिंता नव्हती.

नावेची शेवटची फेरी झाली. नावेतला शेवटचा माणूस खाली उतरला, त्यावेळी रतनच्या आईबापांच्या डोळ्यांतून आनंदानं आसवं आली ! धाडस तर साऱ्या गावकऱ्यांचं होतं. पण रतनच्या चिकाटीला आणि साहसाला तोड नव्हती ! वस्तीवरच्या माणसांनी आणि गावकऱ्यांनी रतनला कौतुकानं जणू न्हाऊ घातलं. अन् देवाला विनवलं, 'रतन म्हणजे अक्षी रतन हाय. तिला उदंड औक्षाची कर रे देवा !'

## बहाद्दूर बिंदा

जवळ जवळ मध्यरात्र झालेली होती. अष्टमीचं फिकट चांदणं मावळत होतं. त्या चांदण्यामध्ये दूरवर पसरलेलं वाळवंट सोनेरी वाटत होतं. चमचमत होतं. आजूबाजूला नीरव शांतता होती आणि लांब सावल्या टाकीत उंटांचा काफिला वारीक किणकिण करीत चालला होता. इतक्यात एकदम गाडीला धक्का बसला अन् बिंदा जागी झाली. अरे! उंटाचा काफिला तर स्वप्नातच राहिला! ती आता होती घोडागाडीत, आणि तिच्या लग्नाची वरात घरी चाललेली होती. बिंदा अर्धवट जागी आणि अर्धवट झोपेत होती. अगदी थकलेली, पेंगुळलेली होती. पापण्या जड झालेल्या. डोळेसुद्धा चटकन उघडेनात.

आणि एकाएकी, 'ठहरो!' अशी आरोळी आणि पाठोपाठ हवेत उडालेली बंदुकीची फैर! बाप रे! बिंदा आता मात्र खडबडून जागी झाली. डोळे टक्क. नजर विस्फारलेली. तिनं घाबरून किंकाळीच मारली. समोर काळाकभिन्न, बडबटीत डोळयांचा, क्रूर चेहऱ्याचा जणू यमपुरुषच असा दरोडेखोर बंदूक रोखून सज्ज होता.

'एक कदम हलाल तर पस्तावाल. मुकाट्यानं शरण या!' घोगऱ्या आवाजात त्याची धमकी. क्षणात साऱ्यांना आपलं भवितव्य कळून चुकलं. गाठ दरोडेखारांशी होती आणि दरोडेखोरांपाशी बंदूक होती. लग्नाच्या वऱ्हाडात एकच गोंधळ उडाला. घाबरल्यामुळे बायकांची रडारडसुरू झाली. पाठोपाठ मुलंही आक्रोश करू लागली, पण त्या निर्जन वाटेवर हा आक्रोश ऐकणार तरी कोण? सगळे लग्नविधी उरकून, साऱ्यांचे निरोप घेऊन निघेनिघेतो रात्र झाली होती. नेहमीचा तर रस्ता. उशीर झाला म्हणून काय बिघडलं? असं म्हणून पुरुष माणसांनी निघायचं ठरविलं. बिदाच्या आईवडिलांनी म्हटलं होतं की, आजची रात्र राहा, उद्या जेवण करून जा. पण वरपक्षानं नाही म्हटलं होतं. त्यांना गृहप्रवेशाचा मूहूर्त साधायचा होता. रात्री मुक्काम केला तर मुहूर्त कसा साधणार?

बिदाच्या वडिलांचा आग्रह न मानता शेवटी सारेजण रात्रीच निघाले. असली रात्र म्हणून काय बिघडतं? नेहमीचा तर रस्ता, बरोबर पुरुष माणसं आहेत. भ्यायचं काय कारण? असा विचार करून त्यांनी निघायचं ठरविलं आणि ध्यानीमनी नसताना हे संकट येऊन उभं राहिलं—अचानक, अनपेक्षित. सारेजण भेदरून गेले. त्यातल्या त्यात तरुण आणि शूर होते ते पुढे सरसावले.

पुढे सरसावले—आणि दोनच पावलांवर थबकले! पुढे जाण्यात अर्थच नव्हता. कारण डाकूंजवळ बंदूक होती. शौर्य गाजवायची, पराक्रम दाखवायची, तिथं संधीच नव्हती. त्यांच्याजवळ होती फक्त कट्यार आणि एक चाकू. तेवढ्या आधारावर बंदुकवाल्या दरोडेखोरांशी मुकाबला करण्यात काहीही अर्थ नव्हता. तो

शहाणपणा ठरलाच नसता. साऱ्यांचा नाइलाज झाला. पुरुषासारखे पुरुष, तगडे आणि बहाद्दर, पण त्यांचा नाइलाज झाला. मनातल्या मनात चरफडत, दात-ओठ खात, हात वर करून सारेजण शरण गेले.

सारा प्रकार बिंदाच्या लक्षात आला. काही क्षणांपूर्वी स्वतःला भाग्यवती समजणारी ती नववधू आता दुर्दैवी पोर ठरली होती. आधीच तिच्या पिताजींनी पुरेसा हुंडा न दिल्यामुळे वरमाय नाराज होती आणि लग्नविधी संपतात न संपतात तोच हे दुर्दैव उभं राहिलं. नव्या बहूचा हा पायगुण असं सासूबाईंच्या मनात येणारच! आणि मग सारा जन्म आपल्याला कशा परिस्थितीत काढावा लागणार, हेही तिला कळून चुकलं. अगोदरच गोंधळलेली आणि बावरलेली बिंदा आता भयंकर भीतीने थरथरू लागली. तिला हुंदक्यांवर हुंदके येऊ लागले. डोळ्यातून अश्रूंच्या धारा चालल्या होत्या. पहाडासारखे धिप्पाड आणि सिंहाच्या छातीचे तिचे सासरे सर्वांच्या पुढे होते.

'अरे हिंमत असेल तर ये लढायला बंदूक टाकून.' त्यांनी गर्जना केली. त्यावर उत्तर फक्त एकाच शब्दात, 'चूप!' बंदूक तशीच रोखलेली. डोळ्यांच्या इशाऱ्यांबरोबर दोन साथीदार पुढे सरसावले आणि बिंदाच्या सासऱ्यांना त्यांनी दोराने गिरफदार करून टाकलं. नवरदेवाचेही हातपाय बांधले. तोंडात बोळा कोंबून तोंड बंद केलं. दरोडेखोरांचा नायक पुतळ्यासारखा स्तब्ध उभा होता. नजर एकेकावर रोखलेली आणि हात बंदुकीच्या चापावर. एक एक करीत लग्नाच्या वऱ्हाडातल्या सगळ्या पुरुषांना त्यांनी जेरबंद करून टाकलं.

बायकांच्या अंगाला फक्त हात लावला नाही इतकच. दागदागिनें सगळे उतरवून द्या, असा हुकूम दिला. 'काही गडबड कराल तर प्राणास मुकाल. याद राखा, आमच्याजवळ रायफल आहे.' या दरडावणीनं साऱ्या बायका गर्भगळीत झाल्या. सगळ्यांचा असा बंदोबस्त केल्यानंतर आता त्यांची नजर वळली बिंदाकडे. हातभर घुंघट ओढून, लालचुटुक घागरा पहेनलेली बिंदा, बाजूला उभं राहून सारा प्रकार बघत होती. मनस्वी भेदरलेली होती ती. पाय नुमते लटपट कापत होते. घशाला कोरड पडली होती आणि छातीचे ठोके जणू दुप्पट वेगाने पडत होते. तिला वाचविण्याचा त्यातल्या त्यात प्रयत्न करणाऱ्या बायकांवर आता पिस्तूल रोखलं गेलं. दरोडेखोर बिंदाच्या रोखाने जाऊ लागले. तेव्हा म्हातारी आत्या मध्ये पडली. 'बाबा मला मार. जीव घे माझा. पण पोरीच्या अंगाला नको हात लावूस!' तिनं विनवणी केली.

'ए चल हट बुढ्ढे.' पण बुढ्ढी हलेना तेव्हा तिच्या कमरेत लाथा मारून तिला तुडवून ते पुढं निघाले. बिंदाच्या माहेरची आलेली पाठराखीण भयानं किंचाळली तेव्हा--

'चूप बे. ओरडायचं काम नाही. नाही तर उचलून फेकून देईन तुला!' दुसऱ्या साथीदारानं दरडावलं. सर्वांचा असा बंदोबस्त झाला आणि डाकूंचा नायक आता पुढं सरसावला. बिंदाच्याजवळ जाऊन त्यानं फर्मावलं.

'घूंघट उठाओ!' बिंदा चुपचाप. त्यावर तो पुन्हा जोरात ओरडला,

'ऐकायला येत का नाही? घुंघट वर उचल.' यावर उत्तरादाखल बिंदाचा एक हुंदका. फक्त.



नायक मानसिंग आता बिंदाच्या जवळ सरकला. आपल्या हातानं सर्वांसमक्ष त्यानं बिंदाचा घुंघट उचलला. तिचा सुंदर, गोरापान चेहरा बघून तो अवाक् झाला आणि पुढच्याच क्षणी तिला चक्क हाताला धरून ओढीत नेऊ लागला. बिंदा रडू लागली. करुण स्वरात तिचा आक्रोश सुरू झाला. बिंदाच्या सासऱ्यानं हंबरडा फोडला. हातपाय तर त्याचे बांधलेलेच होते. तो म्हणाला,

'बहुरानी, यह क्या हो गया !' त्याला एवढं म्हणायला तरी मोकळीक होती. बिंदाच्या नवऱ्याला तर तेही अशक्य होतं. त्याच्या मुसक्याच बांधल्या होत्या. तोंडात बोळे कोंबून त्याचं तोंड बंद केलं होतं. संतापानं तो लाल झाला होता. पण उघड्या डोळ्यांनी हे सारं बघणं त्याला भाग होतं.

डाकूंनी लग्नाच्या वऱ्हाडावरोबर असणाऱ्या पेट्या धडाधड

उघडल्या. पैसे, दागिने आणि भारी कपडे, सारं घेतलं. साथी-दारांच्या घोड्यांवर लूट लादली गेली आणि बिंदाला घेऊन नायक मानसिंग पसार झाला. बिंदानं पुष्कळ धडपड केली· पण तिची ताकत या क्षणी तरी फार अपुरी होती. रडणं, भेकणं, किंचाळणं—तेही तिला आता अशक्य झालं. कारण मानसिंगानं तिला दरडावून सांगितलं, 'चूप ! रडायचं ओरडायचं काम नाही. तोंडानं आवाज तर काढ म्हणजे दाखवितो तुला. नतीजा चांगला होणार नाही!' आणि बिंदा ओठ घट्ट मिटून गप्प राहिली. घोडे दौडत होते. तिच्या सासरची माणसं तशाच अवस्थेत मागं राहिलेली आणि वरातीऐवजी हा असा दुर्दैवी प्रसंग गुदरला ! असाच थोडावेळ गेला. किती अंतर कटलं कुणास ठाऊक. मानसिंग विजयाच्या खुषीत दंग होता. एवढ्यात—

'सुनिये तो' मानसिंगला पहिल्यांदा नुसता भासच वाटला. पण आता बिंदानं त्याच्याकडे तोंड वळविलं अन् त्याचा हात घट्ट धरून पुन्हा जोरानं म्हटलं, 'सुनिये तो, मुझे बहूत डर लगता हैं! आप यहीं रुक जाएँ तो—'

'डर लगता हैं? बेवकूफ. माझ्यासारखा बहाद्दर शिपाई घोड्या-वर असताना तुला कसली भीती वाटते ?' मानसिंग म्हणाला.

'वाटते बाई.' असं म्हणत बिंदानं मानसिंगाचा हात आणखीनच घट्ट धरून ठेवला. बिंदानं जसा हात धरला तसा मानसिंगच्या हातातला लगाम सैल पडला आणि त्याच्या तोंडून एकदम गड-गडाटी हसण बाहेर पडलं. आपल्या साथीदारांना तो म्हणाला,

'सुनते हो ? यह मासूम परी क्या कह रही हैं? तिला भीती

वाटते भीती!' त्याच्या हसण्याला साथीदारांनीही साथ दिली. अन् शेवटी थांबायचं ठरलं.

घोडे थांबले. बिदानं चौफेर नजर टाकली. आता प्रकाश अगदी मंद झाला होता. झाडांच्या सावल्यांनी जास्तच अंधार वाटत होता. त्या अर्धवट प्रकाशात एका झाडाखाली सारेजण थांबले. ते तिघे उंचपुरे, दणकट डाकू आणि ही पंधरा-सोळा वर्षांची सुंदर मुलगी. तिघांनाही वाटत होत की, आता बिदा आपलीच होणार. पण ते तिघं आणि बिदा एकटी. कसा फैसला करायचा ? शेवटी बिदानं सांगितलं.

'तुम्हा तिघांमध्ये सर्वात शूर असेल त्याच्याशी मी लग्न करीन.' तिनं असं म्हटल्याबरोबर मानसिंग आणि जसवंतसिंग यांचं द्वंद्व-युद्ध सुरू झालं. हाणामारी, ठोसाठोशी–तुफान फाइट झाली. दोघं तगडे होते आणि त्वेषानं झुंजत होते. एकमेकांवर चढाई करत होते. आणि मग बघता बघता मानसिगानं आपला वर्षानुवर्षांचा जुना सहकारी जसवंतसिंग या साथीदाराला खलास केलं. आता दुसरा साथीदार पुढे आला–रामसिंग. आणि पुन्हा मानसिंग आणि रामसिंग यांची तुफान दणादणी सुरू झाली. रामसिंग चांगला पन्नाशीला आलेला होता. पण मजबूत बांध्याचा, दणकट हाडा-पेराचा ! जुनं चिवट हाड होतं ते.

रामसिंग आणि मानसिंग दोघेही डावपेचात पक्के होते. तस म्हटल तर दोघांची ही लढत खरोखरच बघण्यासारखी होती. पण इतकी सुंदर लढत बघायला एकमेव प्रेक्षक होती–एकटी बिदा. जीव मुठीत घेऊन, श्वास रोखून बघणारी. जसवंतसिंगला लोळवायला मानसिंगला तसा त्रास पडला नव्हता. पण रामसिंग

जास्त वयाचा असूनही मागं हटत नव्हता. बिंदा त्याच्या फारच मनात भरली होती. एवढी सुरेख, सुलक्षणी मुलगी, आपली सून व्हावी हीच त्याची इच्छा होती. बिंदावर त्याचा डोळा होता, पण तो या अशा अर्थानं. रामसिंग शिकस्त करीत होता. पण अखेर मानसिंगच्या तरुण रक्ताची सरशी झाली. रामसिंग उभ्या उभ्या कोसळला. भुईला पाठ लागली तरी त्याचे शद्ब होते.–

'जुग जुग जिओ बिटिया। शंकरजी तुझं भलं करो.'

जसवंतसिंग आणि रामसिंग दोघांचाही निकाल लागला. मानसिंग विजयी ठरला. तो नायकच होता. पण आता खऱ्या अर्थानं नायक ठरला. त्याचा चेहरा अभिमानानं फुलून आला. चेहरा घामेघूम झालेला, अंगावरचे कपडे धुळीनं आणि रक्तानं भरलेलें. पण त्याही अवस्थेत तो आत्मविश्वासानं विजयाच्या हर्षानं हसला. हसता हसता तोंड, हात पुसू लागला, आणि बिंदाकडे बघत म्हणाला,

'तुझी शर्त झाली ना पुरी?'

बिंदानं आता तोंडावरचा घुंघट वर सारला. जरासं लाजून, जरासं हसून मोठ्या लाडिकपणे ती म्हणाली, 'आपण किती शूर वीर, थोर आहात! आपलं शौर्य पाहून मी थक्क झाले. खरोखर माझं भाग्य की मी आपली पत्नी होणार. आणि खरं सांगू का, तुम्हा तिघांना बघितल्यावर ना, मला आपणच फार आवडला होतात.' बिंदाचे शद्ब ऐकून मानसिंग थक्क झाला. सुंदर चेहऱ्याप्रमाणे तिचा स्वरही सुंदर होता. शद्ब गोड होते. सारंच अनपेक्षित होतं ते. मानसिंग भलताच खूष झाला. मग बिंदा म्हणाली, 'आपण खूप दमलात. जरा आराम करावा. मी पदरानं वारा

घालते: आपले पाय चेपते.' दोघांशी द्वंद्वयुद्ध खेळून मानसिंग खरंच दमला होता. तो सिनेमातला हीरो थोडाच होता, सहा-सहा-जणांशी फाइट करून शिवाय ताजंतवानं राहायला !

मानसिंग खरोखरच दमला होता. झाडाला टेकून तो आरामात पाय पसरून बसला. आता त्यानं बंदूकसुद्धा बाजूला ठेवली होती. दोघा सहकाऱ्यांना खलास केल्यानंतर आता त्याला कसलंच भय नव्हतं. दोन्ही घोड्यांवर लादलेली लूट आणि ही बिंदासारखी सुंदर तरुणी यांचा आता तो एकटा मालक होता. मानसिंग खुशीत आला. विशेषत: बिंदा आपली बायको व्हायला उत्सुक आहे हे कळल्यावर तर त्याला अत्यानंद झाला. त्या आनंदाच्या भरातच त्याने बिंदाला हाक मारली. 'आले, आले' असं म्हणत बिंदा खरोखरच मानसिंगच्या जवळ येऊ लागली. आता मानसिंगला आपण बघतोय ते सत्य की स्वप्न हे कळेना. इतका त्याला परमावधीचा आनंद झाला.

आणि याच गाफील क्षणी बिंदानं बंदूक उचलून मानसिंगवर रोखली. बिंदाच्या हातात बंदूक पाहून मानसिंग हसायला लागला. बिंदा ओरडली,

'हसू नकोस ! आता रडायची पाळी तुझी आहे. मीसुद्धा सरदार वच्चनची नात आहे, आणि लहानपणापासून बंदुकीशी माझी पहचान आहे. वीरचक्र मिळालेल्या पराक्रमी तेगबहादूरची मी बेटी आहे !'

बिंदाचे हे शब्द ऐकले आणि मानसिंग थक्क झाला. तिचे आताचे हे शब्दही अनपेक्षित होते. बिंदानं धडाधड गोळ्या उडवायला सुरुवात केली. बंदुकीतली शेवटची गोळी सुटली आणि

मानसिंग खाली कोसळला. पडता पडता म्हणाला, 'समजली तुझी नेमबाजी. आता काय करणार आहेस? बंदुकीतली शेवटची गोळी संपली.' बिदानं उत्तर दिलं,' संपू देत गोळ्या. रायफल तर शाबूत आहे ना!' आणि खाली कोसळलेल्या मानसिंगवर तिनं बंदुकीच्या दस्त्यान प्रहारांवर प्रहार सुरू केले. दोघांशी द्वंद्व खेळून घायाळ झालेला मानसिंग आता अक्षरशः हतबल झाला. आणि स्वतःला बहाद्दर जवान समजणारा टोळीवाल्यांचा नायक बिदासारख्या तरुण मुलीच्या प्रहारानं अखेर गतप्राण झाला! तो मेल्याची खात्री झाल्यावरही उगाच संशय नको म्हणून बिदानं चार तडाखे हाणलेच आणि मग मात्र तीसुध्दा दमली. हात भरून आले होते. मनावर भयंकर ताण होता आता रात्र संपूर्ण अंधारी झाली होती. भोवताली तीन मुडदे होते आणि त्या निर्जन, भयाण वातावरणात बिदासारखी मुलगी एकटी होती.

तिनं थोडासा विसावा घेतला. पण थोडासाच. जास्त वेळ दवडण्यात अर्थ नव्हता. कुणास ठाऊक कुठून कसलं संकट येऊन ठाकेल ते. साथीदारांच्या घोड्यांचे लगाम तिनं एकत्र केले. मान-सिंगचा फेटा सोडून त्याची तिथं गाठ दिली. दुसरं टोक आपल्या हातात धरलं आणि मानसिंगाच्याच घोड्यावर स्वार होऊन बिदा आल्या रस्त्यान परत फिरली. तीन घोडे एका हातानं संभाळू लागली. स्वतःच स्वतःला धीर देऊ लागली. आता तिच्या अंगी वाघिणीचं बळ आलं होतं. तिन्ही घोड्यांना दौडवीत ती लग्नाच्या वऱ्हाडाकडे वेगाने जाऊ लागली.

घोड्यांच्या टापांचा आवाज पुन्हा ऐकायला आला. त्या-बरोबर पुन्हा हलकल्लोळ उडाला. आहे तरी काय प्राक्तन, असं

वाटून सारी माणसं हवालदिल झाली. मघाच्या डाकूंनी आमचं सर्वस्व नेलं. आमची नवी कोरी बहुराणी पळवून नेली. आता आमच्याकडे उरलंच आहे काय ? फक्त आमचे प्राण ! ते आता तुम्ही घ्या, म्हणजे आम्ही सुटलो. ही काळी तोंडं घेऊन गावी जाणं नको. हे अन् असेच विचार त्या लोकांच्या मनात येत होते.

तोवर बिंदा नजरेच्या टप्प्यात आली. आणि तिला बघून सारी माणसं आश्चर्यानं थक्क झाली. त्यांचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसेना. बहुराणी परत आली ! आणि ती अशा अवस्थेत ! तीन घोडे एकटी दौडवीत. पाहता पाहता बिंदा तिथं येऊन पोचली. खाली उतरून तिनं घोडे बांधले. आणि मग धावतच जाऊन अगोदर सासूचे पाय धरले. सारी अनपेक्षित पण आनंदी घटना बघून सासूच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले. मग बाकीच्या स्त्रियांनाही स्फुरण आलं. चाकू घेऊन त्यांनी सटासट दोर कापले आणि साऱ्या पुरुषमाणसांची सुटका केली. आपल्या सुनेची कर्तबगारी बघून सासऱ्याला कृतार्थ वाटलं. आणि बायका मंडळींकडे बघत ते म्हणाले, 'देज कमी मिळाला म्हणून तुम्ही नाराज झाला होतात. पण हिच्यासारखी धाडसी आणि चतुर मुलगी म्हणजे हिच्या बापानं रत्न दिलं आहे रत्न ! यापेक्षा चांगला देज दुनियेत कुणाला मिळाला नसेल.' 'खरं आहे. बहुराणीनं आज आपली इज्जत वाढविली !' म्हातारी आत्या उद्गारली !

आणि उगवत्या सूर्याबरोबर नवा साज ल्यालेली. बिंदा अभिमानाने फुलून आली. वरात पुन्हा सुरू झाली.

# बिरजू परत येतो

नंदगड. डोंगराच्या उतरणीवरचं चिमुकलं खेडं. निसर्गाच्या कुशीत झोपलेलं. रानवाऱ्याच्या झुळकीवर डोलणारं, अन् आकाशाच्या निळाईत खेळणारं. एका बाजूला गर्द रान पसरलेलं, समोरून खळाळत जाणारी अलोका नदी. तिच्या काठची समृद्ध शेतं. अलोका नदीवर अन् तिच्याकाठच्या शेतजमिनीवर आईसारखं प्रेम करणारे मुग्ध, कष्टाळू खेडूत. एकूण नंदगड मोठं सुखी अन् सुंदर खेडं होतं!

या सुखी अन् सुंदर खेड्यात त्याहून सुखी, सुंदर जीवन जगणारा बिरजू! बिरजू मोठा राजा माणूस होता. होता गरीबच. लहानसंच शेत होतं त्याचं. पण त्या शेतातून मिळणाऱ्या उत्पन्नातसुद्धा असा काही आनंदानं राही की बस्स! जणू त्याची झोपडी नसून मोठी हवेलीच आहे, अन् पुढ्यात चटणीभाकरी नसून पंचपक्वान्नं आहेत. नेहमी हसतमुख, मिठ्ठास वाणी अन् स्वभाव परोपकारी. त्यामुळे गावकऱ्यांचा बिरजूवर फार लोभ. तोसुद्धा असेल त्या गरिबीत, घासातला घास देऊन साऱ्यांच्या उपयोगी

पडायचा.

विरजूच्या घरी तो स्वत:, त्याचे म्हातारे आईवडील अन् एक दूरची विधवा आत्या! त्यामुळे शेतीची कामं सारी विरजूलाच करावी लागायची. अवघा अठरा एकोणीस वर्षांचा विरजू, पण त्याच्या भरंवशावरच सगळं अवलंबून होतं. नांगरटीपासून कापणी-मळणीपर्यंत सारं काही विरजूलाच बघावं लागे. अन् तोही सगळं एकटयाच्या हिंमतीवर पार पाडी. तसा मोठा हिकमती होता तो.

एकदा तो असाच शेतात काम करत होता. कार्तिकाचा महिना हवेत छानपैकी गारठा होता. सुगीचे दिवस. शेत पिकांनी अन् पिकं कणसांनी भरली होती. विरजू आता जवळ जवळ सर्व वेळ शेतातच असे. एवढ्या हातातोंडाशी आलेली पिकं राखायची मोठीच जबाबदारी होती त्याच्यावर. पाखरांना हाकलायचं, गुरा-ढोरांना हुसकायचं, भरलेल्या कणसांची कापणी करायची, अशी सगळ्यांचीच धांदल उडाली. आज याच्याकडे तर उद्या त्याच्या-कडे अशी आळीपाळीने एकजुटीने कामं चालली होती. तोंडानं गाणी म्हणायची अन् हातानं झपझप काम उरकायची.

संध्याकाळची वेळ. मावळतीला चाललेला सूर्य अन् हवेतील माफक थंडी. विरजूचं अजून बरंच काम राहिलं होतं. अन् ते सारं उरकेपर्यंत दिवस मावळून अंधार पडू लागला. नाइलाजानं विरजूनं काम थांबवलं. त्याचे हातपाय धुळीनं माखले होते. कपडे घामाने भिजले होते. उजव्या मनगटानं त्यानं कपाळीचा घाम पुसला अन् भरलेल्या शेताकडे पाहून तो मोठ्या समाधानानं हसला.

*आता मस्तपैकी* आंघोळ करायला पाहिजे. यावेळी नदीचं पाणी कसं छान उवदार होतं. पाण्यात उतरल्याबरोबर दिवसभराचा शीण हलके हलके नाहीसाच झाला. नदीतल्या बारीक, मऊ रेतीनं चोळून चोळून बिरजूनं आंघोळ केली. मग कपडेही धुऊन वाळत टाकले. धोतीच्या दोन्ही टोकाला त्यानं दोन मोठाले दगड ठेवले. नदीकाठी शंकरजीचं देऊळ होतं. देवळाच्या कळसाकडे पाहून त्यानं देवाला मनोभावे नमस्कार केला अन् मग मनाशी विचार केला–अजून काही फार रात्र झाली नाही. जमलं तर थोडे मासे धरावेत! बिरजूला मासळी फार आवडे. अन् त्याची आई माशाचं कालवण इतकं छान बनवायची–बिरजूचे सारे दोस्त त्याच्या माँनं बनवलेल्या कालवणावर खूष असत.

बिरजूनं झोपडीतून जाळं आणलं अन घाटाच्या वरच्या अंगाला जाऊन त्यानं जाळं पाण्यात टाकलं. थोडा वेळ जाऊ दिला अन् हलकेच त्यानं जाळं ओढलं. पण ते सपशेल रिकामं होतं. त्यानं पुन्हा जाळं टाकलं-पुनः रिकामं! चार पाच वेळा असं झालं! बिरजू मग आणखी पुढे गेला. तिथं कोळ्याचा चंदर त्याला भेटला. चंदर मासे धरून घरीच निघाला होता, त्यामुळे तिथं पुनः जाळं टाकण्यात अर्थच नव्हता.! बिरजू आणखी पुढं गेला. त्यानं देवाचं स्मरण करून नदीत जाळं टाकलं अन् पाणी शांत व्हायची वाट बघत तो काठावर बसला–आता पुष्कळ अन् मोठमोठे मासे मिळतील अशी मनात आशा करत!

अन् तेवढ्यात–आ ऽऽ! बिरजू एकदम किंचाळला! क्षणभर काय झालंय हेच त्याला कळेना. पुढच्याच क्षणी त्याला जाणवलं

की आपला पाय कोणी तरी करकचून धरला आहे अन् आपण झपाट्यानं पाण्यात खेचले जात आहोत. बिरजूला हेही कळलं की आपल्याला पाण्यात खेचणारा माणूस नाही—मग, माणूस नाही तर कोण? निसटण्याच्या धडपडीत बिरजूच्या हाताला खडबडीत काटेरी काही तरी लागलं. देवा रे! हीं तर सुसर!! हळूच गुपचूप येऊन सुसरबाईनं शिकार केली होती अन् मासळीची आशा करणाऱ्या बिरजूला तिनं पकडलं होतं. धिप्पाड काटेरी देहाची सुसर अन् तिचा भयंकर जबडा!

बिरजूनं निसटण्याची खूप धडपड केली. पण मगरमिठीतून सुटका होणं अशक्यच होतं. त्यानं 'धावा धावा' म्हणून हाकाहीं मारल्या. पण इतक्या लांब त्याच्या हाका ऐकू तरी कशा जाणार? बिरजूनं त्याच्या परीनं शिकस्त केली पण सुसरीनं उलट आपली पकड अधिकच घट्ट केली. आता बिरजू सटपटला. मगरीच्या तावडीतून आता सुटका नाही, हे त्याला कळून चुकलं. आता फक्त मृत्यू! आपले म्हातारे आई-वडील, आपले दोस्त अन् आपली जमीन—सगळ्यांच्या आठवणीनं बिरजूच्या डोळ्यात पाणी आलं अन पुढच्याच क्षणी भीतीनं आणि थकव्यानं बिरजू बेशुद्ध पडला!

सुसरीनं त्याला पाण्यातून बरच पुढं नेलं. तिथं पाणथळ दल-दलीच्या जागेत एका खबदाडीत सुसर राहायची. बिरजूला तिनं ओढत ओढत खबदाडीत नेलं अन ती थांबली. बिरजू अजून बेशुद्धच होता; आणि निसटण्याच्या प्रयत्नात त्याला बरच लागलं होतं. त्या लहानमोठ्या जखमांनी रक्ताळलेला बिरजू आता सुसरीच्या—म्हणजे यमाच्या कराल जबड्यात होता! आता इथून

तो निसटू शकत नाही याची खात्री झाल्यावर नंतरच सुसरीनं तोंडात धरलेला त्याचा पाय सोडला. त्यावेळी बिरजूच्या पायातून रक्ताची अक्षरशः चिळकांडी उडाली.

पाच-सहा तासांनी बिरजू शुध्दीवर आला. त्यानं डोळे उघडून आजुबाजूला पाहिलं. चहूबाजूंनी नुसता अंधार. खाली लिबलिबीत थंडगार चिखल. अन् सर्वांगाला भयंकर ठणका ! त्याला एकदम कसला बोधच होईना ! अंगात उठून बसायचंसुध्दा त्राण नव्हतं. जरा वेळानं लाटांचा आवाज आणि शेवाळाचा वास त्याला जाणवला. अन् नंतर लक्षात आलं की आपण सुसरीच्या खबदाडीत आहोत म्हणून. सुसरीच्या खबदाडीत–तरीहि जिवंत ! आश्चर्यंच ते. बिरजू बेशुध्दच पडला होता इतका वेळ. त्यामुळे तो मेला आहे अशीच सुसरीची समजूत झाली ! अर्थात सुसरीच्या सवयीप्रमाणे तिनं बिरजूला 'कुजायला' ठेवून दिलं. सुसरीला ताज्या मांसाचं वावडं. शिकार केली की तो मृत प्राणी ती आपल्या गुप्त जागी एखाद्या खबदाडीत आणून ठेवते, अन् नंतर ते प्रेत कुजलं की मग ती खाते ! त्या प्रमाणे तिनं बिरजूला आपल्या खबदाडीत आणून ठेवलं-अन् नंतर चार-पाच दिवसांनी सुसरबाई बिरजूचा समाचार घेणार होत्या.

त्या निस्त्राण अवस्थेतसुद्धा ही गोष्ट बिरजूच्या लक्षात आली अन् त्याचबरोबर तो घाबरून ताडकन् उठू लागला. त्या खबदाडीत कसलं उठता येणार होतं ? उभं राहता येण्याइतकी उंची तरी कशी असणार तिथं ? उलट त्या तेवढ्याशा धक्यानंसुध्दा बिरजूला खरचटायचं किंवा टेंगूळ यायचं पण तसं झालं, नाही. उलट तो उठण्याच्या प्रयत्नात वरून एकदम भुळूभुळू मातीच पडली.

म्हणजे ? हा काय प्रकार ? बिरजूनं हातानं मुद्दाम टोकरून पाहिलं तर पुन: वरून भुशभुशीत चिखल माती पडली.

इतक्यात पाण्यात खळबळाट झाला. सुसरबाई येत होत्या. सुसर दिसल्याबरोबर बिरजू एकदम स्तब्ध झाला अन् कसली हालचाल न करता पडून राहिला. सुसर खबदाडीत आली अन् जवळ येऊन बिरजूला हुंगू लागली. तिनं बिरजूला दोनचार वेळा हुंगलं अन् ती परत निघून गेली. सुसर लांब गेलेली पाहिल्यावर बिरजू पुन: उठला अन् पुन: त्यानं मघाच्या जागी टोकरायला सुरुवात केली. तासा दोन तासात थोडं थोडं करत त्यानं बरच टोकरलं. दोनचार ओंजळी माती निघाली.

तोवर पुन: पाण्यात खळबळाट झाला. बिरजूला दिसलं, तिकडून सुसर येत होती. त्या बरोबर तो स्तब्ध पडून राहिला. सुसरीच्या दृष्टीनं बिरजू मेलाच होता. ती दोन-चार तासानी येऊन आपली शिकार ठिकाणावर सुरक्षित आहे ना एवढं बघून, त्याला हुंगून जायची सुसरीची चाहूल लागताच बिरजू निपचित पडून



राह्याचा. सुसर लांब गेली की परत टोकरायला सुरुवात ! आता सवयीनं त्याला त्या खबदाडीतसुद्धा थोडं थोडं दिसू लागलं. तिथं एक हाडूक पडलं होतं. सुसरीनं खाऊन टाकलेल्या एखाद्या प्राण्याचं असणार ते ! तसं मोठं बळकट होतं अन् थोडंसं टोकदार सुद्धा-

बिरजूला आता बराच धीर आला. ते हाड घेऊन तो थोडं थोडं पण सतत पोखरत राहिला. एकीकडे त्या संकटानं तो धास्तवला होता तर दुसरीकडे निसटण्याची आशा त्याला धैर्य देत होती. मगरीच्या जबड्यातून सुटका अशक्य या निराशेनं मालवू पाहणाऱ्या धैर्यदीपाला थोडसं तेल मिळालं–अन् त्या थोड्याशाच तेलानं आशेची ज्योत पुनः प्रज्ज्वलीत झाली. सुसरीची चाहूल लागली की, मेल्यासारखं पडून राह्यचं अन सुसर लांब गेली की, पुनः पोखरायला सुरुवात करायची हा बिरजूचा अखंड कार्यक्रम सुरू झाला.

सुटकेची शाश्वती नाही, चहुबाजूंनी नुसता अंधार, पोटात अन्नाचा कण नाही की पाण्याचा थेंब नाही. (समोर अथांग नदी पण जवळचं पाणी इतकं घाण–चिखलमय ! ) आजूबाजूला कुजलेल्या मांसांची दुर्गंधी अन् उरावर प्राण संकटाची धास्ती ! भविष्याच्या कल्पनेनं काळजात धडकी तर विचार करकरून मेंदू बधीर व्हायची वेळ आली.

पण इतकं असूनही बिरजूनं प्रयत्न सोडला नाही. सुसर लांब गेली की पोखरण सुरूच. संकटाची परिसीमा होते त्यावेळी धाडसी माणसाच्या अंगात काही वेगळंच बळ संचारतं ! चार दिवस अन् चार रात्री अशा गेल्या अन् पाचवे दिवशी बिरजूला आशेचा किरण दिसला त्याच्या प्रयत्नानं त्या खबदाडीला लहानसं

भोक पडलं होतं अन् त्यातून त्याला बाहेरचा प्रकाश स्वच्छ दिसत होता !

आता बिरजूला मार्ग सापडला होता. अन् इथली जमीन तर खूपच भुसभुशीत होती. थोडचाशा प्रयत्नानंच तिथं पुरेसं विवर तयार झालं अन् मग सुसर खूप लांब गेल्याची खात्री होताच बिरजू चपळाईनं त्या विवरातून निसटला ! बाहेर आल्यावर त्यानं आधी स्वच्छ मोकळचा हवेत श्वासोच्छ्वस केला. त्या साऱ्या परिश्रमांनी बिरजू इतका थकला होता की त्याला अक्षरशः धाप लागली. तशाच अवस्थेत तो चालण्याचा प्रयत्न करू लागला. कशीबशी दहावीस पावलं त्यानं टाकली, तोच त्याला दुरून गुराख्याची पोरं येताना दिसली. सारी त्याच्या ओळखीची. त्याच्या बरोबरीची. तेवढा दिलासा मिळाला, अन् आतापर्यंत कसबसं टिकवलेलं अवसान गळालं—बिरजू एकदम मूच्छित होऊन पडला!

त्याबरोबर गुराख्याची पोरं धावली. एकानं पटकन पाणी आणून दिलं. दुसऱ्यानं जवळचा कांदा फोडून बिरजूच्या नाकाशी धरला. हळूहळू बिरजू सावध झाला. त्याच्या गुराखी मित्रांनी बिरजूला शिदोरीतलं खाऊपिऊ दिलं. बिरजू पुरता हुषारला. तोवर बिरजू परत आला ही बातमी त्या एवढचाशा गावभर वाऱ्यासारखी पसरली. काळजीनं हवालदिल झालेल्या त्याच्या आईवडिलांनी ही बातमी ऐकली ते थेट नदीकिनारी धावत सुटले ! स्वतःच्या डोळ्यांनी त्यांनी बिरजूला पाहिलं, तो सुखरूप आहे हे पाहिलं अन् अत्यानंदानं त्यांच्या डोळ्यांत अक्षरशः आनंदाश्रू आले ! दोघांनी आपल्या लेकराला घट्ट मिठी मारली. लोकांनी आनंदानं आरोळचा मारल्या, कुणी फटाके उडवले. म्हाताऱ्या आयाबायांनी

कानशिलावर बोटे मोडून बिरजूला औक्ष चिंतलं अन् बिरजूच्या मित्रांनी तर अक्षरशः त्याला डोक्यावर घेऊन मिरवत, वाजत गाजत घरी आणलं! सारा सोहळा बघून, लोकांना आठवण झाली, कालियादमन करून परत आलेल्या कन्हैयाची! साऱ्या गावकऱ्यांचा लाडका बिरजू परत आला होता काळाच्या जबड्या-तून निसटून परत आला होता!

काहीसा योगायोग अन् बिरजूचं सुदैव हे तर खरंच, पण न डगमगता हिंमतीनं प्रयत्न चालू ठेवले म्हणूनच बिरजू परत येऊ शकला.

## नितीन दि ग्रेट

'ए आईग्र– जातो ना ग'!

'नाही हं नितीन. उन्हाचं कुठं जायचं नाही. दुसरं काही तरी खेळ.'

'अग पण कुणाशी खेळू ? सगळी मुलं शाळेत गेलीत. मग एकटयानं काय खेळायचं ?'

'एकटयाचे खेळ. मेकॅनो, पेशन्स, खेळ काहीतरी. वाचत बस. माझ्या मागे नको कटकट लावूस. मी पडते जरा पाच मिनिटं.'

नितीन हिरमुसला. आज त्याच्या शाळेला सुट्टी होती. जनरल चॅंपियनशिप मिळवल्याबद्दल अर्थात बाकीच्या शाळा मात्र नेहमी-प्रमाणे चालूच होत्या. जवळपासची, शेजारपाजारची सगळी मुलं शाळेला गेलेली होती. अन् नितीन तेवढा एकटा घरात होता. तो अन् त्याची आई. त्याचा दादा कॉलेजमध्ये आणि ताईसुद्धा शाळेत गेली होती. बाबा कामावर गेले होते. साहजिकच त्याची सगळी भुणभुण आईच्या मागे होती. आता सायकल घेऊन त्याला अजयच्या घरी जायचं होतं आणि तिथून भैरवनाथाच्या देवळा-

जवळ पाकोळ्या पकडायला जायचा त्यांचा बेत होता. अजयचं घर तसं जवळच होतं पण भैरवनाथाचं देऊळ? अडीचतीन मैल तरी असेल. एखादेवेळी चार मैलसुध्दा. अर्थात हे आईच्या मतानं. नितीनच्या मते तर भैरवनाथाचं देऊळ 'अगदी जवळ' होतं पण तिकडे त्याला उन्हाचं पाठवायला आई बिलकुल तयार नव्हती. कसलं उन्ह होतं बाहेर. ऑक्टोबर हीटना. घरात बसूनसुध्दा जीव कासावीस होत होता पण नितीनला मुळी ऊन्हच लागत नव्हतं. त्याला कधी ऊनही लागत नाही आणि थंडीही वाजत नाही. पण या आईचंच फार असतं एकेक. 'थंडी वाजते, स्वेटर घाल.' 'उन्ह आहे, बाहेर खेळू नकोस.' मोठ्या माणसांचं काहीतरीच असतं एकेक.

आईनं पाठवलं नाही म्हणून नितीन अगदी खट्टू झाला. मनातल्या मनात का होईना तो आईवर चरफडत होता. घरात असं कोंडल्यासारखं बसायचं, वैताग नुसता. त्याऐवजी पाकोळ्या पकडायला गेलं तर काय धमाल येईल! पण ही आई. पाठवेल तर ना. एवढ्यात 'क्रिंगऽऽग!' दारावरची बेल वाजली.

'कोण आलंय बाई आत्ता. बघ रे नितीन!' आई पडल्यापडल्याच म्हणाली. मनातून तिला आत्ता कुणी यायला नको होतं. कारण तिला झोपायचं होतं. नितीनन पळत जाऊन दार उघडलं. दारात कुणी नवखाच माणूस उभा होता.

'आपला पंखा दुरुस्त करायचा ना? मी कंपनीकडून आलोय.' त्या माणसानं सांगितलं. पंखादुरुस्तीचं ऐकू आलं तशी नितीनची आई पटकन उठून बसली. आता तिची झोप-बीप पार गेली. लगबगीनं बाहेर येऊन ती म्हणाली, 'बरं झालं बाई! उकाड्याचा

कोण कहर आणि नेमका आत्ताच पंखा बिघडलेला !'

तो माणूस घरात आला आणि इकडे तिकडे पाहात त्यानं विचारलं, 'कोणता पंखा दुरुस्त करायचा ?' 'हा काय—वरचा सीलिंग फॅन. आठ दिवस झाले बिघडलाय–' आता नितीन उत्साहानं सरसावला. त्याला आपली आयती करमणूक मिळाली. तोंडानं वडबडत तो पखेवाल्याचं दुरुस्तीचं काम बघू लागला. त्या माणसाला स्टूल दे, टेबल दे, पुसायला फडकं दे असं त्याचं सुरू झालं. मध्येच उभं राहून त्याचं निरीक्षण चाललं होतं. पंखे-वाल्याची ठाकठोक चालू होती आणि नितीनचेही त्याच्या परीनं उद्योग चालू होते. त्या माणसानं मध्येच हत्यारांची पिशवी उघडली आणि मोठाच्या मोठा लांबलचक स्क्रू ड्रायव्हर बाहेर काढला. अबब ! केवढा मोठ्ठा स्क्रू ड्रायव्हर ! काय बरं म्हणतात याला ? अऽऽ मार्तुल. हो मार्तुलच. शिवाय दोन हातोड्या, पाना, पक्कड, करवत—आणि या सगळ्या हत्यारांच्या पसाऱ्यात नितीनला काहीतरी निराळी वस्तू दिसली. लांबलचक आणि लखलखीत. अरे बापरे ! मनातून तो कसला घाबरला ! पण तोंडानं मात्र काही बोलला नाही. जरावेळ तो अगदी गप्प गप्प बनला. जसं काही तोंडाला कुलुप. मनातल्या मनात मात्र त्याचे खूप विचार चालले होते. मग जराशानं म्हणाला, 'तुम्ही किती भराभर करता हो हे सगळं. मला शिकवाल का पंखा दुरुस्त करायला ?' पखेवाला खुषीत येऊन किंचितसा हसला. नितीन पुढे म्हणाला,

'तुम्ही आजच आलात ते फार बरं केलंत. पंखा बिघडल्यामुळं




इतका काही वैताग आला होता. रात्री पंखा नसल्यामुळं आमच्या बाबांना तर धड झोपसुद्धा लागत नव्हती. अन् आईला दुपारी झोप लागत नव्हती. पण तुम्हाला कुणी हो सांगितलं आमचा पंखा बिघडला म्हणून?'

'मला सांगितलं आमच्या साहेबांनी. तुझे वडील आज ऑफिसात जाताना आले होते आमच्या दुकानात.' त्याबरोबर नितीन पुन्हा चमकला त्याचे बाबा घरातून सात वाजताच बाहेर पडतात फॅक्टरीत जायला. तेव्हा तर दुकानं बंद असतात. मग ऑफिसात जाताना बाबांनी निरोप कसा काय सांगितला असेल?

नितीन पुन्हा गप्पच झाला. मघासारखा. मध्येच पिशवीकडे, मध्येच पंखेवाल्याकडे बघत राहिला. मग खिशात हात घालून म्हणाला,

'पंखेवाले, तुम्ही कशाला सारखे चढउतार करता? तुम्हाला काय लागेल ते पिशवीतनं मी काढून देईन. मला येतात सगळी हत्यारं ओळखता. ही पक्कड, ही हातोडी, हा मार्तुल–'

'अरे कशाला? नको,नको–' नितीनच्या हातून त्यानं आपली हत्यारं जवळजवळ हिसकावून घेतली आणि ती पिशवीत कोंबून पुढे म्हणाला, 'अरे तुला का म्हणून उगाच त्रास? ह्या कामाचे आम्हाला पैसे मिळतात. फुकट थोडंच करायचंय?' पंखेवाल्यानं पिशवी काखोटीला अडकवली आणि पिशवीसकट तो उंच स्टुलावर चढू लागला. आतून नितीनची आई ओरडली,'गप रे नितीन त्यांना त्रास नको देऊ हं. नाहीतर ते पंखा दुरुस्त करणार नाहीत. तुला कशाला ज्यात त्यात लुडबुड लागते रे?' आईनं दटावलं. पण आईच्या दटावण्याचा काही एक उपयोग झाला नाही. नितीन तस्सा तिथं उभं राहून दुरुस्तीचं काम एकटक पाहू लागला. अशीच दोन पाच मिनिटं गेली अन् पंखेवाला म्हणाला,

'बाई थोडं पाणी द्या प्यायला.' त्याबरोबर नितीन एकदम ओरडला.

'मी देतो, मी देतो. एकदम थंडगार. अगदी फ्रीजमधलं!'

'कशाला फ्रीजमधलं– तुझं काहीतरीच एकेक हं. फ्रीजच्या पाण्याचं निमित्त करून उगाच शेजारच्या दीदींना उठवायचं नाही.

'असं काय ग आई? मला बर्फ देणार आहेत ना त्या. तू विचार पाहिजे तर त्यांना.' नितीन आईचा हात ओढून 'चल

चल' म्हणू लागला.

'नितीन आता मार खाशील हं. आज फारच चाललंय तुझं एकसारखं.' नितीनला किंचित ढकलल्यासारखं करून आई स्वैपाक घराकडे जायला वळली. आईची पाठ वळल्याबरोबर नितीन बाहेर सटकला अन् उड्या मारत जिना चढू लागला. चारसहा पायऱ्या चढला न चढला एवढ्यात तो एकदम किंचाळू लागला.

'आई, आई ग! मेलो!' नितीन इतका काही जोरात किंचाळला की त्याची आई धावतच बाहेर आली.

'असा कडमडच्या आहे—काय रे, काय झालं?' नितीनची आई त्याला धरून उठवू लागली. नितीनचं रडणं चाललंच होतं. रडत, हुंदके देत त्यानं कसंबसं सांगितलं,

'पाय मुरगळाय ग. भयंकर दुखतोय.' नितीन पुन्हा ओक्साबोक्सी रडू लागला.

'अरे जिना सरळ चढावा. उड्या मारत दोन दोन पायऱ्या एकदम चढला असशील. एक मिनिट धड स्वस्थ बसायला नको तुला.' आई पुटपुटू लागली. खाली वाकून नितीनच्या पायाला कुठे लागलय ते पाहू लागली. तेवढ्यात नितीननं हळूच आईला सांगितलं, आई, तो पंखेवाला लबाड आहे. त्याच्या हत्यारांच्या पिशवीत मोठाच्या मोठा चाकू आहे. तू घरात जाऊ नकोस.' अन् त्यानं आईचा हात घट्ट धरून पुन्हा रडायला सुरुवात केली. रडणं, विव्हळणं, हुंदके यांच्या प्लेबॅकवर नितीननं मोठ्या युक्तीनं आईला केवढी महत्त्वाची वातमी दिली. पण आई उलट म्हणाली, 'काहीतरीच तुझं. अरे, त्यांना हत्यारं लागतात तऱ्हेतऱ्हेची. उगाच काहीतरी संशय तुझा.' आई पुन्हा पुटपुटली.

आता मात्र नितीन खरोखरच घावरला. कारण हत्याराच्या पिशवीत त्यानं मोठाच्या मोठा सुरा खरंच पाहिला होता. पंखा दुरुस्तीला मुळात सुऱ्याची जरूरच काय ? अन् इतका मोठा सुरा गुंड माणसाशिवाय कोण कशाला वापरील? शहरातल्या बनवा-बनवीचे वेगवेगळे किस्से नितीननं ऐकलेले होते. त्याची खात्री पटली की, पंखादुरुस्तीच्या निमित्तानं हा कुणीतरी लुच्चा, लबाड माणूस घरात शिरलाय. पण आईला पटतच नव्हतं ना ! याला बाहेर काढण जरूर आहे. निदान आपण घरात जाणं म्हणजे निश्चितच धोका आहे. पण आई ऐकायलाच तयार नाही. वरं, त्या माणसाच्या देखत काही स्पष्ट बोलताही येईना. नितीन नाही म्हटलं तरी गोंधळून गेला. पखेवाला तिकडं पाण्याची वाट बधत उभा राहिला होता. पण लहान मुलाला जोरात लागलय आणि तो मोठमोठ्यानं रडतोय, अशावेळी लवकर पाणी द्या असं तो कस म्हणणार ?

काय करावं ते नितीनला कळेना. पण वेळ काढण्यासाठी त्यानं रडणं, ओरडणं तेवढं जोरजोरानं चालू ठेवलं. मधूनच तो आईला म्हणायचा,

'आई ग, इथून कळ येतीय. इथं घट्ट धरून ठेव !' मधूनच म्हणायचा, 'बापरे ! असलं लागलंय. बहुतकरून हाड मोडलं माझं.' आणि हा हू' करून तो जोरात कण्हू लागला. मग एकदम त्याला काय वाटलं कुणास ठाऊक. आईला म्हणाला,

'आई, त्या खिडकीच्या वरच्या कमानीत बाबांनी मलम ठेवलंय ते लाव ना जरा गुडघ्याला. नाही नाही—हात नको सोडूस. अयाई ग ! धरून ठेव घट्ट ! पंखेवाले, तुम्ही द्या हो काढून—प्लीज. त्या-

त्या कॅलेंडरच्या तिथं, खिडकीच्या वर. अयाई ग! अग, ते नवीन मलम नाही का बाबांनी आणलं–लचकलं किंवा मुरगाळलं तर लावायचं! तुला नाही माहीत. विषारी आहे म्हणून वर उंचावर ठेवलंय.' आणि नितीन पुन्हा जोरानं किंचाळू लागला. पंखेवाल्यानं मुकाट्यानं खिडकीपाशी स्टूल नेलं आणि स्टुलावर चढून वरच्या कमानीत तो औषध शोधू लागला. त्याची पाठ वळल्याबरोबर नितीन ताड्कन् उठला आणि पळत जाऊन त्यानं आपल्या घराचा दरवाजा पटकन बंद करून बाहेरून बोल्ट लावून टाकला. तसाच तो मागच्या दारी पळत सुटला. आई 'नितीन, नितीन' म्हणून ओरडतच होती. पण तिकडे लक्ष न देता तो धूम पळत सुटला आणि मागच्या दारालाही त्यानं बाहेरून कडी घालून टाकली. आता आपण कोंडले गेलो हे पंखेवाल्याच्या लक्षात आलं. त्याबरोबर तो स्टूलावरून उडी मारून दाराच्या दिशेनं धावत सुटला आणि 'दार उघडा, दार उघडा' करून ओरडू लागला. क्षणभर काय झालंय हेच आईला समजेना. इतकी ती साऱ्या प्रकारानं थक्क झाली. आणि 'काय बाई तरी पोरगं हे. पंखेवाल्याला कोंडून ठेवलंय खुशाल.' असं म्हणत दरवाजा उघडायला पुढे झाली.

'आई, दार उघडू नकोस. नाही, नाही, उघडायचं नाही दार–' आता नितीन उलट आईला दटावू लागला आणि पुढं होऊन त्यानं आईला अडवलं.

पंखेवाल्यानं आधी सरळपणे 'दार उघडा, दार उघडा' म्हटलं पण नितीन दार उघडायला तयार नाही हे त्यानंही ऐकलं. मग मात्र तो जाम भडकला. आतून जोरजोरानं दाराला धडका देऊ लागला. त्याच्या पाठोपाठ धमक्याही देऊ लागला. शिवीगाळ करू

लागला. तरीही नितीननं दार उघडलं नाही. त्या माणसाच्या धमक्या आणि शिवीगाळ ऐकल्यावर मग कुठं त्याच्या आईची खात्री पटली की आलला माणूस कोणीतरी गुंड, मवाली असणार म्हणून, इकडे त्या माणसानं आत कपडे, भांडी यांची फेकाफेक सुरू केली. कपबशा आणि पेले आपटून फोडून टाकले. टेबल-खुर्च्यांची आदळ-आपट सुरू केली. अन् मुकाट्यानं लवकर दार उघडा, नाहीतर रॉकेल टाकून घर पेटवून देईन अशीही धमकी दिली. या साऱ्या आरड्या-ओरड्यानं आजुबाजूचे लोक जमा झाले. दुपारची शांत वेळ असल्यानं हा गोंधळ सगळ्यांनाच ऐकायला गेला. बघता बघता ही ऽऽ गर्दी जमली

त्या माणसाला आत कोंडलं खरं, पण आता पुढं काय करायचं? पोलिसमध्ये कळवायचं तरी चौकीवर कोण जाणार? कारण जमलेल्या गर्दीत पुरुषमाणूस कुणीच नव्हतं. सगळ्या बायका अन् लहान मुलं. पुरुष फक्त दोघं. एक विनूभैया. पण त्याला तर पायाला प्लॅस्टर केलेलं आणि दुसरे मिकीचे आजोबा. पण त्यांना बरं नव्हतं. नितीन म्हणाला,

'नुसतं पोलीस चौकीवर जायचं ना? मग मीच जातो मायकल-वरून!'

'अरे पण तुला लागलंय ना? आत्ता तर कसला जोरजोरानं किंचाळत होतास' शेजारच्या काकू म्हणाल्या. तर नितीन उत्तरला-'छे हो! लागलं बिगलं सव झूट. काही म्हणजे काही झालं नाही मला. सगळं खोटं.'

'म्हणजे?' आता नितीनच्या आईलाही आश्चर्य वाटलं.

'अग, तुला माझं काही खरंच वाटत नव्हतं. मग काय करणार?

म्हटलं मी रडायला लागलो, म्हणजे तू लगेच धावत येशील.' नितीन म्हणाला.

'कमाल आहे बाबा तुझ्यापुढे. तरी मला वाटलं, इतकं लागलंय पायाला तरी दार लावायला धावत बरा गेला.'

नितीन सायकलवरून जाईन म्हणाला खरा. पण सायकलची किल्ली तर घरात अडकलेली. मग? आता काय करायचं? तोच पुन्हा म्हणाला,

'काही नको सायकल अन् फिअकल. पोलीसचौकी काही इथून लांब नाही. मी आत्ता पळत जाऊन सांगून येतो.' काही क्षणांपूर्वी पाय मुरगळला म्हणून विव्हळणारा आणि किंचाळणारा—अर्थात तसं नाटक करणारा—नितीन आता धूम पळत सुटला. काही मिनिटातच तो पोलीसचौकीवर पोचला. तिथं एकच टेबल होतं. एकच खुर्ची होती. त्या खुर्चीवर बसलेला माणूस तिथला साहेब असावा असं नितीनला वाटलं. तिथं जाऊन खुर्चीवरच्या माणसाला तो सांगू लागला,

'अहो, आमच्या घरात एक गुंड शिरलाय. त्याच्याजवळ मोठाच्या मोठा चाकू आहे. तुम्ही लवकर लवकर चला.' पण त्या खुर्चीवरच्या माणसाने नितीनकडे फारसं लक्ष दिलं नाही. तिथं आणखी चारपाच पोलीस होते. माणसांची जा ये चालू होती. पलीकडे आणखी एक खोली होती. तिथंही काही माणसं होती. पण नितीनकडे फारसं कुणी लक्षच दिलं नाही. या बारा-तेरा वर्षांच्या मुलाचं सांगणं त्यांना कुणाला खरंही वाटलं नाही. शिवाय चौकीवर तक्रार नोंदवायची तर बाकीचीही माहिती सांगावी लागते. ती नितीनला सांगता येईना. शेवटी नितीन

पोलिसांना म्हणाला,

तुम्ही अगोदर माझ्याबरोबर घरी चला. नाहीतर तो माणूस दार फोडून पळून जाईल. त्याच्याजवळ हत्यारांची पिशवीच आहे. तुम्हाला खोटं वाटतंय का हे सारं? आमच्या शेजारच्या बिल्डिंगमध्ये फोन आहे. तुम्ही फोन करून खात्री करून घ्या. त्यांचा नंबर ४२२३२ आहे!'

शेवटी पोलीस इन्स्पेक्टरनं नितीनच्या सांगण्याखातर फोन केला.

'हॅलो! मी पोलीस चौकीवरून बोलतोय. तुमच्या घराजवळ काही गंभीर घटना घडली आहे काय?'

'होय, होय. शेजारच्या घरात एका गुंड माणसाला कोंडलं आहे. तो गज कापायचा प्रयत्न करतोय. तुम्ही लवकरात लवकर या.' फोनवरून एका बाईनं उत्तर दिलं. आता इन्स्पेक्टरनाही विश्वास ठेवणं भाग पडलं. नितीनचा घाबरलेला, रडवेला चेहरा अन् 'पोलिसकाका, तुम्ही लवकर चला.' असा तगादा पाहून तर त्यांची खात्रीच पटली. त्यांनी जीपच बाहेर काढली. बरोबर चार शिपाई घेऊन जीप भरधाव सुटली आणि काही क्षणातच नितीनच्या घरासमोर उभी राहिली. तोवर आजूबाजूचे आणखी लोक जमा झाले होते. घराभोवती या साऱ्या बघ्यांचा गराडाच पडला होता. रस्त्यानं जाणारी येणारी माणसं, घरगडी, फेरीवाले, तेही तिथं जमा झाले. आता गुंडाला निसटणं शक्यच नव्हतं. त्याच्या धमक्या आणि आरोळ्या मघाशीच बंद पडल्या होत्या आणि निसटण्याचा प्रयत्नही त्यानं सोडून दिलेला होता. एवढ्या जमावातून निसटणं शक्य होतं का त्याला? तो बाहेर आलाच असता तर लोकांनी

त्याला अक्षरश: ठेचूनच काढलं असतं. म्हणूनच आतला गुंड आता स्वस्थ बसला होता. बाहेर जायची त्याची हिम्मत नव्हती. बाहेर पडून 'पब्लिक' नं चेचण्यापेक्षा सरळ पोलिसांना शरण जाणं हेच आता शहाणपणाचं होतं. जीपचा आवाज त्यानं ओळखला आणि पोलिस व इन्स्पेक्टर उतरलेलेही पाहिले. पोलिसपार्टीनं दार उघडलं. इन्स्पेक्टरनी पिस्तुल रोखलं. त्याबरोबर आतल्या माणसानं चक्क 'हँण्डस्अप्' केले. पोलिसांनी हातकड्या अडकवून त्याला गिरफदार केले. तो कुप्रसिद्ध गुंड जग्गू होता. दुपारच्या निवांत वेळी कुठल्या तरी निमित्तानं घरात शिरकाव करून घ्यायचा आणि बाया बापड्यांना सुऱ्यांचा धाक दाखवून पैसे किंवा दागिने लुबाडायचे हा त्याच्या गुन्ह्याचा खास प्रकार होता ! दुपारच्या वेळी पुरुषमाणसं कामावर गेलेली असतात. मुलंही घरी नसतात. अशा वेळी जग्गू आपला मोका साधीत असे.

आतापर्यंत शहरात निरनिराळ्या ठिकाणी असे पाच गुन्हे घडल्याची नोंद झाली होती. पण एवढे पाच गुन्हे होऊनही गुन्हेगार मात्र सापडला नव्हता. जग्गूच्या धमक्यांमुळं, जीवाच्या भीतीनं कोणी पोलिसमध्ये जायचं टाळलं, तर आता काय उपयोग म्हणून कुणी गप्प बसलं. एक दोघांनी तक्रारी केल्या होत्या. पण त्यांना गुन्हेगाराचं धड वर्णनसुद्धा सांगता येईना. त्यामुळे पोलिसांना गुन्हेगार शोधणं शक्य झालं नव्हतं. परंतु सुऱ्याचा धाक दाखवून दुपारच्या वेळी हिंडणारा हा गुंड पकडू न शकल्यामुळे पोलिस खातंही अस्वस्थच होतं. तोच कुप्रसिद्ध जग्गू आता पोलिसांच्या तावडीत सापडला होता. अन् त्याला पकडण्याचं श्रेय होतं अवघ्या बारा-तेरा वर्षाच्या नितीनला !

एवढ्या मुलाला हे जमलं तरी कसं ? कारण नितीन म्हणजे काही कुणी सॅण्डो नव्हता की जेम्स बॉण्ड नव्हता. पण एक तर वेळ बरी म्हणायची अन् दुसरं म्हणजे नितीनची चौकस बुद्धी अन् निरीक्षण. सकाळी सातला आपले वडील कामाला जातात अन् त्यावेळी पंख्याचं दुकान बंद असतं हे लक्षात आलं तेव्हाच त्याला पंखेवाल्याचा संशय आला होता. पण तरीसुध्दा तोंडानं तो काही बोलला नाही ! हो ! उगाच तेवढ्यामुळे पंखेवाला बिथरायला नको. पण त्याच्या हत्यारांच्या पिशवीत तो मोठा चाकू पाहिल्यामुळे नितीनची खात्रीच पटलेली होती. म्हणून तर ते जिन्यातून पडण्याचं नाटक वगैरे. नाहीतरी 'कडमडचा नितीन' असं त्याचं नाव पडलंच होतं. शिवाय एक नंबरचा नकल्या. धाडस तर त्यानं केलंच होतं. पण हे साहस करताना शक्तीपेक्षा युक्ती आणि बुध्दीच त्याच्या उपयोगी पडली. ते कमानीतलं मलम वगैरेसुध्दा काही खरं नव्हतं. सगळ्या बाता ! त्याला कुणीकडून तरी आईला बाहेरच गुंतवायचं होतं. शिवाय मलम काढायच्या निमित्तानं पंखेवाल्याची दरवाजाकडे पाठ झाली की दारपण लावून टाकायचं होत.

आणि हो ! आईचं न ऐकता तो बाहेर गेला नाही म्हणूनही हे शक्य झालं. जर का सायकल काढून तो पाकोळ्या पकडायला गेला असता तर? तर त्या जग्गू गुंडानं आईचं काय केलं असतं कुणास ठाऊक ? त्या चौदा इंची लखलखीत सुऱ्याची आठवण झाली अन् एवढा वेळ बहादुरीच्या गोष्टी करणाऱ्या नितीननं एकदम आईच्या गळ्याला मिठी मारली. आईच्या डोळ्यातलं पाणी पाहून तोही कावराबावरा झाला. तरीसुध्दा तोंडानं मात्र म्हणाला,

'आई, रडतेस काय ? हँ ! बायका नाही तरी भित्र्याच फार!

# एकाकी झुंज

बाहेर मिट्ट काळोख होता. त्यात अंधारी रात्र. अगदी ब्लॅक-आऊट असावा तसं दिसत होतं. रात्रीचे अकरा वाजून गेलेले. गावाबाहेर समुद्रकिनारी असलेल्या त्या वसाहतीत आता शुकशुकाट झाला होता. सारी घरं खिडक्यांचे डोळे मिटून अन् अंधारी चादर ओढून सागरलाटांच्या अंगाईनं सुस्त झोपली होती. एकटा समीर मात्र जागा होता. त्याला झोपच येत नव्हती. किती वेळ तो जागाच्या जागाच होता.

वास्तविक आज दिवसभर इतकं काही हुंदडणं झालं होतं त्याचं, की साडेआठ-नऊलाच झोपायचा तो. पण काय झालं होतं कुणास ठाऊक? डोक्यात नाना विचारांची गर्दी अन् त्या गर्दीत समीरची झोप उडाली समीरची आई आज गावात मैत्रिणीकडे जेवायला गेली होती. रात्रीचं उशीरानं परतण्याऐवजी तिकडेच मुक्काम करून ती उद्या सकाळी येणार होती. अन् समीरचे दादा छापखान्यात नोकरीला होते. ते रात्री जवळजवळ एक वाजता येणार होते. कारण आज अचानकच त्यांना

रात्रपाळीला जावं लागलं होतं. घरात मुलंच. शिशिर आणि हेमांगी कधीच गाढ झोपले. त्यांची तिकडे मध्यरात्र झाली होती अन् समीर–

आज दुपारपासून तो अस्वस्थच होता. कारण आज दुपारीच त्याचं अन् आईचं जरा खटकलेलं होतं. जरा कसलं, चांगलंच. समीरच्या मनातून नाविक दलात भरती व्हायचं होतं. अन् आईचं म्हणणं–'जेमतेम चौदा वर्षांचा पुलगा तू– मोठ्या गप्पा मारतोस बहादुरीच्या! ते काही नाही. हल्ली त्या जगजित बरोबर जरा दोस्ती वाढलीय– त्याचं ऐकून काही बाही डोक्यात घेऊन बसतो. नेव्हीत जाणार म्हणे. आधी आपला अभ्यास नीट पुरा कर!'

'पण आई–अभ्यास पुरा होईपर्यंत मी चौदाच वर्षांचा राहणार आहे का? मला तिथे प्रवेश तरी मिळेल का?

'अरे, पण नेव्हीत किंवा आर्मीत जायचं खूळ कुठून डोक्यात घेतलंस तू?' आई आश्चर्यानं थक्क झाली होती. समीरचा हा हट्ट तिला नवीनच होता. अन् तिच्या अंदाजाप्रमाणे समीरला अशी प्रेरणा देणारा जगजितच होता. जगजित सहगल हा समीरचा नवा मित्र होता. जगजितचे वडील, त्याचे थोरले तीन भाऊ, त्याचा मामा, काका, चुलतभाऊ सगळे सगळे आर्मीत होते. अन् खुद्द जगजितच्या नसानसातून जणू साहसी रक्तच वाहत होतं! अशा जगजितच्या वागण्याबोलण्यानं समीर इतका प्रभावित झाला होता की रात्रंदिवस त्याला जगजित अन लढाई याशिवाय दुसरं काही सुचत नव्हतं!

जगजितचे वाडवडील आर्मीतले. तोही नंतर तिकडेच जाणार

होता. समीरनं मात्र ठरवलं- आपलं आडनांव आंग्रे. आपण कान्होजीचे वंशज. तेव्हा आपण नेव्हीतच जायचं! नेव्हीत जायच, दूरदूरच्या सफरी करायच्या, आपल्या भारताचा विशाल किनारा सुरक्षित ठेवायचा अन् देशाचं संरक्षण करणारा एक नौसैनिक म्हणून अभिमानानं मिरवायचं! ठरलं, नक्की ठरलं. इतक्या चांगल्या निश्चयाला आई नक्कीच हो म्हणेल. अन् समजा आई नाहीच म्हणाली तर? तर हट्ट धरून, भांडण करून, बाबांचं मन वळवून–पण परवानगी मिळवणारच!

अन् याच विचारांमुळे समीर सारखा अस्वस्थ होता. वास्तविक समीरचा अभ्यास चांगला होता. पण आज अभ्यासातसुद्धा त्याचं लक्ष नव्हतं! लहानपणापासून–म्हणजे अगदी पाच-सहा वर्षांचा असल्यापासून तो नियमानं पुळणीवर हिंडायला जायचा. पण आज समुद्रकिनारी गेल्यावर तो उल्हसित होण्याऐवजी गंभीरच झाला होता. तिथं गेल्यावर सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, वसईचा वेढा, संभाजीचं आरमार याशिवाय त्याला दुसरं सुचत नव्हतं. पहिल्यापासून समीरला समुद्राचं प्रेम फार. पोहायचं, रेतीत लोळायचं, हुंदडायचं, शंखशिंपले जमा करायचे, मासे पकडायचे, पुनः डुंबायला पडायचं हा त्याचा सुट्टीचा कार्यक्रम ठरलेला! पण आज त्याला वाटलं नेव्हीत जायचा आपला विचार म्हणजे वाळूच्या किल्ल्याप्रमाणे तर ठरणार नाही ना? निरनिराळ्या शंकाकुशंका त्याच्या चिमुकल्या डोळ्यांत हिंदकाळत होत्या अन् तो अंथरुणावर चुळबुळत पडला होता.

इतक्यात त्याला किनाऱ्यावरून सागरलाटांचा आवाज भेदून जाणारी किंकाळी ऐकू आली. समीर ताडकन उठला. आत्ता या

वेळी इकडे कोण असेल? गावाबाहेर अन् समुद्रकिनारी या अंधाऱ्या रात्री कोण गेलं असेल? कुणाची किंकाळी असेल ती ? समीरनं क्षणभर विचार केला. पुढच्याच क्षणी त्यानं हातात कुलुपकिल्ली घेतली खिशात टॉर्च घातला. काठी घेतली, शिशिर हेमांगीला नीट पांघरूण घातलं अन् तो बाहेर पडला. दाराला नीट कुलूप घातलं अन् त्यान साद घातली– 'सीझर!'

सीझर, समीरचा कुत्रा, धावतच त्याच्याजवळ आला.'सीझर –छू' समीर ओरडला. त्याबरोबर तो दांडगा कुत्रा किनाऱ्याकडे धावत सुटला. पाठोपाठ समीरसुद्धा. तो किनाऱ्यावर पोचला त्यावेळी एक छोटी लाँच जवळच पाणी कापीत चालली होती. अन् वाळूत कुणीतरी माणूस अंगाचं मुटकुळं करून पडला होता त्याच्या अंगावर तीन-चार खोकी वेडीवाकडी पडली होती. त्या भाराखाली तो चेंगरला होता.आणि कण्हत होता. समीरनं प्रकाश-झोत टाकला. त्या माणसानं संपूर्ण काळा पोशाख घातला होता. अंगातून रक्त वाहात होतं. 'अरे अरे ! भाऊ, कोण तू ? आता इकडे कसा आलास? अन ही खोकी कसली?' समीर खोकी हलवू लागला. तो माणूस काहीच बोलेना. त्याचं विव्हळणं तेवढं वाढलं. समीरला त्याची दया आली. पण खोकी आकाराच्या मानानं जरा जडच होती. सहजासहजी हलत नव्हती. शेवटी समीरनं त्या माणसाच्या छातीवरचं ओझं आधी दूर केलं. त्या-बरोबर त्याचे हातसुद्धा मोकळे झाले. त्या माणसानं आधी मोकळेपणानं नीट श्वास घेतला. मग हातानं बाकीची खोकी दूर केली अन् तो एकदम उभा राहिला. उभा राहिल्यावर गळयात अडकवलेला रुमाल त्यानं तोंडावर आडवा ओढून घेतला–


त्याबरोबर समीर चमकला ! 'सीझर–सीझर छू !' सीझर त्या अनोळखी माणसावर तुटून पडला अन् जोरजोरानं भुंकू लागला. सीझरची चढाई त्याला अनपेक्षित होती. सीझरनं त्याला क्षणभरसुद्धा उसंत दिली नाही. त्यानं खिशात हात घातला. आता तो खिशातून बाहेर काढणार–पिस्तुल ! कारण आपल्या जाड घोगऱ्या आवाजात तो समीरला म्हणत होता–'फुकट मरायचं आहे का जीव वाचवायचा आहे ?'

समीर क्षणभर सटपटला. याला प्रसंगाची पूर्ण कल्पना आली. तो चक्क गुंडाच्या पुढ्यात उभा होता. ज्याला समीरनं मदत केली होती, तो आता उलटला होता. समीरची जान खतऱ्यात होती. तो गुंड चांगला उंचापुरा, धिप्पाड अन् पिस्तुलधारी होता, तर समीर अवघा चौदा वर्षांचा कोवळा मुलगा–तोही निःशस्त्र ! समीरचा सारा भार आता फक्त सीझरवर अन् देवावर ! ! समीरनं थोडा वेळ तसाच जाऊ दिला. कारण सीझरच्या हल्ल्यानं तो गुंड चांगलाच जेरीला आला होता. खिशातलं पिस्तुल बाहेर काढूनही समीरच्या रोखानं नेम धरणं त्याला जमेना. हे पाहिल्या-बरोबर समीरची खात्री पटली की त्याचं पिस्तुल खोटं आहे. नाही तर सीझरवरच पहिली गोळी झाडली असती !

या विचारासरशी समीरला एकदम खूप धीर आला. 'अरे हट ! नकली पिस्तोल को मारो गोली–सीझर शाब्बास ! शाब्बाश मेरे दोस्त !' समीर आनंदानं ओरडला. त्याबरोबर तो गुंड संतापला. 'शैतान कहीं का, हमारा पिस्तोल नकली नहीं असली हैं ! तुझी जान वाचवायची असेल तर मुकाटचानं शरण ये !' आपल्या जाड घोगऱ्या आवाजात तो गुरगुरला.

'ही खोकी कसली आहेत.? इथे कुठून आली? इथून आत्ता लाँच गेली ती कसली? कुणाची?'

'शट अप्! जादा बकवास करू नकोस.' गुंड ओरडला. पण त्या ओरडण्यात दम नव्हता. कारण या पोरट्यानं आता आपल्याला पुरतं पकडलं याची त्याला कल्पना आली. आज आपल्या 'काळ्या कामगिरीवर' तो एकटाच आला होता. चोरट्या मालाची ने-आण करणाऱ्या टोळीचा तो साथीदार होता. आज मिळालेल्या संदेशाप्रमाणे 'माल' थोडा होता. त्यानं एकट्यानंच 'स्पॉट' वर यायचं होतं. त्याप्रमाणे तो आला होता. ती लाँच, ती खोकी, अन् त्या गुंडाचा अवतार पाहिल्याबरोबर तो स्मगलर आहे हे समीरनं ओळखलं, स्मगलर! म्हणजे आमचा शत्रू! देशाचा विश्वासघात करणारा बेइमान!



'सीझर! और जोरसे मेरे दोस्त!' समीर पुन: ओरडला आणि त्यानं स्वत:च काठीचे तडाखे हाणायला सुरुवात केली. सीझर चांगला शिकवलेला कुत्रा होता. त्या स्मगलरनं फेकलेल्या रबरी पावाकडं त्यानं ढुंकून पाहिलंसुद्धा नाही. उलट त्याचे कपडे फाडून ओरबडायला सुरुवात केली. सीझरचा जोर पाहून समीरलाही त्वेष आला. त्या चौदा वर्षांच्या पोराच्या अंगात जणू अभिमन्यू संचारला. समीर आणि सीझर, दोघांच्या हल्ल्यापुढे स्मगलर हतबल होऊ लागला. समीरही आता 'धावा धावा' करून ओरडू लागला.

एवढ्यात एक जोरदार शिट्टी घुमली, पोलिसांची! अन् पाठोपाठ एक जीप येऊन थडकली. आपला धावा ऐकून पोलिस पाठोपाठ हजर झाले हे समीरला क्षणभर खरंच वाटेना! गाडीतून उतरले चार पोलिस अन् इन्स्पेक्टरनं ताबडतोब पिस्तुल रोखलं अन् दरडावलं–'हँडस अप!'

आता पोलिसांच्या स्वाधीन होणं याशिवाय त्या गुंडाला पर्याय नव्हता. 'तू कोण बेटा?' इन्स्पेक्टरनं समीरला विचारलं. एव्हाना समीर पुरता घामाघूम झालेला होता. त्या हाणामारीत त्याला बरंच लागलंही होतं. त्याही अवस्थेत त्यानं मोठ्या अभिमानानं उत्तर दिलं–'मी समीर आंग्रे–अन् हा आमचा सीझर!'

'शाब्बास–शाब्बास समीर·शूराचा बच्चा आहेस!' इन्स्पेक्टरनं समीरची पाठ थोपटली. खोकी जीपमध्ये ठेवली गेली. तो गिरफदार केलेला स्मगलर, पोलिसपार्टी, समीर आणि सीझर सर्वजण जीपमधून पोलिसठाण्यावर निघाले. एवढ्या प्रबळ गुंडाशी समीर

आणि समीरनं एकाकी झुंज दिली याचं सर्वांना खूपच कौतुक वाटत होतं. गोळा केलेली चारी खोकी फोडल्यावर आत कोणता माल निघेल ? घड्याळं की सोनं ? की ट्रान्झिस्टर ? की कापड ? अशी समीरच्या मनात कल्पना आली. त्याबरोबर त्याला अचानक आठवलं—आपण समुद्रावर पोचण्यापूर्वी एक किंचाळी ऐकली होती. अन् या स्मगलरच्या अंगातून रक्तही येत होतं याचा अर्थ तिथे अगोदर कुणीतरी दुसरी व्यक्ती होती !

पोलिसाजवळ समीरनं आपली शंका बोलून दाखविली. स्मगलरनं प्रथम टाळाटाळ केली. पण पोलिसी प्रसाद मिळाल्यावर त्यानं कबूल केलं की तिथं त्याच्या विरुद्ध टोळीचाही साथीदार आलेला होता ! दोन्ही टोळ्यांना एकदम खबर लागली होती. अन् एकमेकांचे शत्रू असलेले दोन स्मगलर एकच माल घेण्यासाठी एकाच वेळी आमने सामने आले होते. त्यांच्यात प्रथम बाचाबाची अन् नंतर मारामारी झाली होती. दुसऱ्या स्मगलरनं एक जीव-घेणा ठोसा लगावला अन् पहिल्याच्या अंगावर ती जडभारी खोकी ठेवून, एक खोकं घेऊन तो पसार झाला होता ! समीरनं जी किंकाळी ऐकली ती ठोशामुळं, वेदना असह्य झाल्यामुळं या पहिल्या गुंडानंच ठोकली होती !

पोलिसांना त्या दुसऱ्या स्मगलरचाही ठावठिकाणा मिळाला. त्याचे लागेबांधे फार मोठ्या टोळीपर्यंत होते ! या साऱ्याच घटना अनपेक्षित आणि थरारक होत्या. समीरच्या कल्पनेपेक्षाही किती तरी मोलाची कामगिरी त्यानं पार पाडली होती !

इकडे समीरचे दादा रात्री परत आले तर घराला कुलुप. डुप्लि-केट चावीनं त्यांनी दार उघडलं. आत बघतात तर समीरचा पत्ता

नाही ! सीझरचाही ठिकाणा नाही ! दादा घाबरले, सीझर आणि समीर दोघांचीही त्यांना काळजी वाटू लागली. काय झालं तरी काय ? क्षणभर ते सुन्नच होऊन गेले. इतक्यात त्यांच्या दारात पोलिस व्हॅन येऊन उभी राहिली ! आवाज ऐकून दादा बघायला बाहेर आले तर व्हॅनमधून समीर अन् सीझर उड्या टाकून दादांकडे धावले ! वडिलांना मिटीच मारली समीरनं ! पाठोपाठ पोलिस इन्स्पेक्टर आले.

'कॉंग्रॅच्युलेशन्स मि. आंग्रे ! समीर इज् सच ए ब्रेव्ह बॉय !'

आणि सर्व हकीकत ऐकून दादांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले !

'आता तरी मला नेव्हीत जायची परवानगी द्याल ना ?' समीरनं वडिलांना विचारलं.

'जरूर–जरूर !' दादांनी समीरची मागणी एकदम मान्य केली.

'पण बेटा समीर, नेव्हीत किंवा आर्मीत न जाताही शौर्य गाजवता येतं–खरं की नाही ?' इन्स्पेक्टरच्या या प्रश्नाला समीरनं हसतच होकार दिला.

□ □ □

## युक्तिवीर

छोटया दोस्तांनो ! शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ. ही म्हण तुम्हाला माहीतच आहे. अर्थात युक्ती श्रेष्ठ म्हणून शक्ती कनिष्ठ असं नाही. ती हवीच. पण संकटकाळात मनोधैर्य हेच महत्त्वाचं ठरतं, असा याचा अर्थ. या मनोधैर्याच्या बळावरच एकेकदा साधारण माणसंही अचाट साहस करून जातात. आता मी ज्याची गोष्ट सांगणार आहे, तो श्रीनिवास नुसता साधारण मुलगा नाही, तर अंगानं लहानखुरा आणि वर अपंगसुद्धा आहे. पण त्याची बुद्धी तीक्ष्ण आणि मन खंबीर, म्हणूनच थोराड आणि दांडगट माणसंही भेदरली, तिथं या अपंग छोकऱ्यानं केवढं धाडस दाखवलं !

रात्री साडे आठ नऊची वेळ असेल. जेवणंखाणं आटोपून सगळेजण गप्पा मारत होते. आज गप्पांना विशेष रंग भरला होता. कारण आजच्या गप्पांत आक्काही सामील झाली होती. इतके दिवस तिचं जेवण स्वतंत्र—बाळंतिणीच्या खोलीत तिलाही सगळ्यांच्यात येऊन बसावं बोलावं असं वाटायचं. पण आजीनं डोळे मोठे केले की आक्का एकदम चूप ! आता तिलाही दोन महिने झाले होते. अन् म्हणूनच ती सगळ्यांच्या बरोबर-स्वैपाक-

घरात जेवायला येऊन बसली होती. बाळही शांत झोपला होता. त्यामुळे आक्का निवांत होती.

हसत बोलत जेवणं झाली. गप्पाही झाल्या. शेवटी आई म्हणाली—'उठा आता ! हात वाळले असतील. अन् आक्का तुही तुझं आवरून झोप बाई. पावसाळ्याचे दिवस आहेत. गारठ्याची बसू नकोस जास्त वेळ.' त्यावर श्रीनिवास म्हणाला, 'हो ग आक्का, आता उठू या. तू मला नवीन पुस्तक देणार आहेस ना? जयंत-रावांनी माझ्यासाठी पाठवलेलं?' आक्काला कौतुकानं हसू आलं. तसा श्रीनिवासनं मघापासून दोन तीन वेळा पुस्तकाचा विषय काढला होता. पण सगळ्यांच्या गप्पांमध्ये त्याच्या बोलण्याकडे कुणी फारसं लक्ष दिलं नाही. उलट दादा म्हणाला होता—

"होय रे बाबा—पण आक्काला नीट जेवू तरी दे." श्रीनिवासला पुस्तकांचं भयंकर वेड. हाती येईल ते पुस्तक तो पहिल्या सपाट्या-ला वाचून पूर्णच करायचा, की मग पुनः नव्या पुस्तकाचा ध्यास! तीन तीनशे पानांचं पुस्तक बसल्या बैठकीला संपवायचा तो. वाचनाची गती जबरदस्त, अन् बुद्धीही तल्लख. त्यामुळे वाचलेलं सगळं त्याच्या नीट लक्षात राह्यचं. वयाच्या मानानं त्याचं सामान्य-ज्ञानही चौफेर. वेगवेगळ्या विषयांची त्याला खूप माहिती होती. बाबांनी त्याच्यासाठी वाचनालयाची स्वतंत्र वर्गणी भरली होती. पण लायब्ररीच पुस्तक तो झटक्यात वाचून काढी. की पुनः आता काय हा प्रश्नच पडायचा.

पण घरातली सगळीच माणसं, त्यांचं वाचनवेड विचारात घेऊन त्याला नेहमी नवी नवी पुस्तकं आणून देत. कारण—कारण श्रीनिवास एका पायानं पांगळा होता ! लहानपणी पोलिओ

झाल्यामुळे त्याचा एक पाय जन्माचा अधू झाला होता ! तब्येतही मध्यमच. चणीनं लहान, अंगानं काटकुळा, त्याच्या आजीसारखा. तेरा चौदा वर्षाचं वय, पण त्या अधू पायामुळं कुबडीच्या किंवा काठीच्या आधाराशिवाय त्याला सरळ दहा पावलंही चालता येत नसे ! त्यामुळे त्याच्या बाहेरच्या कार्यक्रमांवर नाही म्हटलं तरी बंधन आलं होतं. खेळणं, धावणं, पोहणं, टेकडीवर फिरायला जाणं, झाडावर चढणं- बाळवयातली सारी सुखं त्याला पारखी झाली होती. त्याचे खेळ म्हणजे पत्ते, कॅरम, बुद्धीबळ, सोंगट्या किंवा व्यापार. त्याला स्वतःला ब्रिज आणि बुद्धीबळ जास्त आवडे. पण बरोबरीच्या बाकीच्या मुलांसाठी तो इतरही खेळ खेळायचा.

त्याला बाबांनी बासरी, बुलबुल तरंग, वाजाची पेटी, अशी वाद्यंही आणून दिली होती--त्याचा वेळ चांगला जावा म्हणून ! इतर गोष्टीत त्याचं मन रमायचं पण त्याचा खरा ओढा पुस्तकाकडेच होता. अन् म्हणूनच जयंतरावांनी, आक्काच्या यजमानांनी मुंबईहून ते पुस्तक खास पाठवलं होत. गुळगुळीत कागदाचं, सुंदर छपाईचं अन् मोठ्ठी रंगीत चित्रं असलेलं इंग्रजी गोष्टींचं पुस्तक होतं ते. श्रीनिवासला ते पुस्तक बघायची अन् वाचायची भयंकर घाई झाली होती.

"चल ना ग आक्का." त्यानं पुन: म्हटलं. तशी आक्कानं चटकन गरम पाण्यानं हात धुतले अन् ती तिच्या खोलीकडे निघाली. काठी टेकत टेकत श्रीनिवासमुद्धा तिच्या मागोमाग निघाला. आक्का दारापर्यंत पोचली असेल नसेल तोच–

तिनं एकदम किंचाळी फोडली ! काय झालं म्हणून सगळेजण धावले अन् खोलीतलं दृश्य बघून भीतीनं सगळ्यांची जशी

वाचाच बसली ! बाळाच्या पाळण्याजवळ काळाकभिन्न नाग फ
उभारून, वेटोळं घालून बसलेला ! चांगला मनगटा एवढा ज
असेल. हालचाल काही नाही. होता स्वस्थ बसलेला. पण-
अखेर तो नाग होता. केव्हा काय करील याचा नेम थोडाच ?
पाच क्षण असेच सुन्न गेले. भीतीनं आधी कुणाला काही सुचेच
बाबा एवढे धाडसी, पण तेही गोंधळून गेले. साप मारायला जा
अन् त्यानं पाळण्यावरच झेप घेतली तर ? दादा तर चांग
तालीमबाज गडी. पण तोही हतबुद्ध होऊन गेला. अन आक्का
ती उभीच्या उभी थरथरत होती. डोळ्याला धारा लागलेल
आईची अन् आजीचीही तीच अवस्था. 'सुभान्या ऽऽ ! धाव
नाग–नाग आहे !' तिनं हाक मारली.

सुभान्या धावत आला. हातात काठी पण–पण मारणा
कशी ? नाग चवताळून पाळण्यावर झेपावला तर ? सुभान्या
एवढा तगडा गडी पण तोही गोंधळून गेला. त्यातून पाळणा होता
भिंतीच्या कडेला. पलीकडून जाऊन काठी मारायलासुद्धा जागा
नव्हती ! सगळी माणसं भेदरून नुसती थिजली गेली ! छोटा
श्रीनिवास सगळं बघत होता. या अचानक संकटानं तोही घाबरून
गेला. आक्का, त्याची एकुलती एक लाडकी बहीण. पहिल्या
बाळंतपणाला माहेरी आलेली. तिच्या गोंडस, गुटगुटीत बाळाशी
खेळण्यात त्याचे तासचे तास आनंदात गेलेले. पण आता मात्र
सगळा आनंद क्षणात झाकोळून गेला होता. काय करावं कुणालाच
कळेना. इतक्यात श्रीनिवासला काय वाटलं कुणास ठाऊक. तो
आईला म्हणाला-"आई, पाळण्याच्या मागं खिडकी आहे ना, तिथं
तू गोडचातेला ... ठी आहे ना--अॅल्युमिनि-

BVBK-0400910